
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३१९
www.ramprahar.com

गुरुवार, ६ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राज्याच्या विविध भागांमध्ये पावसाच्या सरी



**मुंबई** : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाच्या सरी पडू लागल्या आहेत. मुंबई, पुणे, रायगड, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व राज्याच्या अन्य भागांत बुधवारी (दि. ५) पूर्वमोसमी पाऊस पडला. या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले. मुंबई-गोवा महामार्गावर पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना अडचणी येत होत्या, तर काही ठिकाणी झाडे व वीज कोसळण्याच्याही घटना घडल्या. दरम्यान, पाऊस पडत असल्याने शेतकरीवर्ग सुखावला आहे, तर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांनाही या पावसामुळे दिलासा मिळाला. नैऋत्या मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती आहे. मोसमी पाऊस गुरुवारी तळकोकणात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शनिवारपासून पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.


### अंतरंग

जूनच्या पहिल्या आठवड्यात समुद्राला येणार मोठी भरती/२

अनंत गीतेंच्या पराभवानंतर म्हसळ्यात ठाकरे गटाला धक्का/५

पाकिस्तानी खेळाडूला सेलिब्रेशन पडले महागात/८


# पंतप्रधान मोदी एनडीएच्या नेतेपदी

## राष्ट्रपतींना भेटून सत्तास्थापनेचा दावा करणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १७वी लोकसभा भंग केल्यानंतर आता देशात पुन्हा सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. लोकसभा निवडणूक निकालात भाजपच्या नेतृत्वातील एनडीएला पुन्हा बहुमत मिळाले आहे. त्यात भाजपने सर्वाधिक २४० जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे दिल्लीत बुधवारी (दि. ५) झालेल्या एनडीएच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर राष्ट्रपतींना भेटून सत्तास्थापनेचा दावा करण्यात येणार आहे.

पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीस टीडीपी प्रमुख चंद्राबाबू नायडू, जेडीयूचे प्रमुख नितीश कुमार, एलजेपीचे चिराग पासवान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह एनडीएतील इतर घटकपक्षांचे नेते उपस्थित होते.

नेतानिवडीच्या प्रस्तावात म्हटले आहे की, भारताच्या १४० कोटी जनतेने गेल्या १० वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकारमधील जनकल्याणकारी योजनांतून देशातील प्रत्येक भागात विकास होताना पाहिला आहे. दीर्घकाळापासून जवळपास सहा दशकानंतर देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा पूर्ण बहुमताने सशक्त नेतृत्व निवडले आहे.

२०२४ची लोकसभा निवडणूक नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित लढलो आणि जिंकलो याचा आम्हाला गर्व आहे. आम्ही एनडीएचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांनी सर्वसंमतीने निवड करीत आहोत. त्यांच्या नेतृत्वात एनडीए सरकार भारतातील गरीब, महिला, युवा, शेतकरी, शोषित, वंचित आणि पीडित नागरिकांना सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. भारताच्या वारशाचे रक्षण करण्यासाठी व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी एनडीए सरकार जनतेतील आयुष्यात सुधार आणण्यासाठी प्रयत्नशील राहील, असेही प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. या प्रस्तावावर २१ नेत्यांची स्वाक्षरी आहे.





**पुणे : मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी विजयाची हॅट्ट्रिक साधली आहे. त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार व उद्धव ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे-पाटील यांचा ९६ हजार ६१५ मतांनी पराभव केला. खासदार श्रीरंग बारणे यांना पनवेल विधानसभा मतदारसंघातून मतांची निर्णायक आघाडी मिळवून देणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी तिसऱ्यांदा खासदार झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, तर मताधिक्य दिल्याबद्दल खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, अभिषेक पटवर्धन, केदार भगत, रूपेश नागवेकर आदी उपस्थित होते.**

# विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी मला सरकारमधून मुक्त करा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पक्षनेतृत्वाला विनंती

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत जो पराभव झाला त्याची सर्व जबाबदारी माझी आहे. आता मला विधानसभेसाठी पूर्ण उतरायचे आहे. त्यामुळे मला सरकारमधून मोकळे करावे, अशी मी विनंती करणार आहे. बाहेर राहिलो तरी मी काम करीन, पण मला आता पूर्णवेळ विधानसभेकडे लक्ष केंद्रित करायचे आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते बुधवारी (दि. ५) मुंबईत बोलत होते. दरम्यान, त्यांनी असे करू नये याकरिता भाजप नेते, पदाधिकारी त्यांची मनधरणी करीत आहेत.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात आम्हाला अपेक्षित यश मिळाले नाही किंबहुना आमच्या अपेक्षापेक्षा खूप कमी जागा मिळाल्या. महाराष्ट्रात आमची लढाई महाविकास आघाडीसोबत होतीच, त्यासोबतच नरेटिव्हसोबत करावी



लागली. त्यामध्ये संविधान बदलणार असा नरेटिव्ह तयार करण्यात आला. हा नरेटिव्ह आम्हाला थांबवता आला नाही. त्याला आम्ही उत्तर देऊ शकलो नाही, त्याचा आम्हाला फटका बसला.

भाजपला राज्यात लोकांनी नाकारले अशी परिस्थिती नाही. सम-समान मते मिळाली आहेत. आज आम्ही बसून निवडणुकीचा आढावा घेतला आहे. कोणते मुद्दे होते याचा आम्ही विचार केला. ज्यांना जास्त जागा मिळाल्या, त्यांचे अभिनंदन करतो. जनतेने दिलेले जनादेश मानून आम्ही पुढील तयारी करण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

मी सरकारच्या बाहेर राहिलो तरी सरकारमध्ये आम्हाला जे काही करायचे आहे ते आम्ही करणार आहोतच. त्या टीमसोबत मी असेन. या संदर्भात लवकरच पक्षाच्या वरिष्ठांना मी भेटणार आहे. त्यानंतर त्यांच्या सल्ल्याने ते जे सांगतील त्यानुसार मी पुढची कार्यवाही करेन, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### 'देशात एनडीए आणि भाजपला मोठा कौल'

या वेळी देशातील भाजपसह एनडीए आघाडीच्या कामगिरीबद्दल बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंडित नेहरू यांच्यानंतर पुन्हा एकदा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याचा आशीर्वाद जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिला. १९६२नंतर पहिल्यांदाच सलग तिसऱ्यांदा सरकार होतेय. ओडिशामध्ये भाजपचे प्रथमच सरकार होतेय. आंध्र प्रदेशमध्ये चंद्रबाबूंच्या नेतृत्वास पसंती मिळाली. अरुणाचलमध्ये पुन्हा भाजपचे सरकार आले. लोकसभेसाठी एनडीए आणि भाजपला मोठा कौल दिल्याबद्दल जनतेचे आभार. इंडिया आघाडी तयार झाली होती, त्या संपूर्ण इंडिया आघाडीला जितक्या जागा मिळाल्या त्यापेक्षा जास्त जागा एकट्या भाजपला देशात मिळाल्या आहेत. सर्वांनी एकत्र येऊन नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न केला, पण भाजप त्यांच्यापेक्षा मोठी राहिली. एनडीएचे घटकपक्ष मिळून सरकार तयार होत आहे.

## निवडक

### केजरीवालांच्या कोठडीत वाढ, अंतरिम जामीन अर्जही फेटाळला

**नवी दिल्ली** : मद्य घोटाळाप्रकरणी राऊज व्हेन्यूच्या विशेष पीएमएलए न्यायालयाने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत १९ जूनपर्यंत वाढ केली आहे तसेच वैद्यकीय कारणास्तव सात दिवसांच्या जामीनासाठी दाखल केलेली अंतरिम जामिनाची याचिका फेटाळून लावली. दरम्यान, न्यायालयाने संबंधित अधिकाऱ्यांना केजरीवालांच्या आवश्यक वैद्यकीय चाचण्या करण्याचे निर्देश दिले आहेत.

### नाशिकमध्ये कार घुसली थेट घरात; तीन जण गंभीर जखमी

**नाशिक** : येथे विचित्र अपघात घडला आहे. मद्यधुंद चालकाची कार भिंत फोडून थेट घरात घुसली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत तसेच घराचेही मोठे नुकसान झाले आहे. नाशिकच्या सातपूर शिवाजीनगर परिसरात हा अपघात घडला. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मद्यधुंद कारचालक जगदीश धर्माळे याला गंगापूर पोलिसांनी अटक केली आहे.

# चंद्रकांत खैरेंनी आपल्याच पक्षावर फोडले पराभवाचे खापर

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळाले. या निवडणुकीत महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांचा विजय झाला. ठाकरे गटाचे चंद्रकांत खैरे पराभूत झाले. या पराभवानंतर खैरे यांनी आपल्याच पक्षाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यावर निशाणा साधत आपल्याच पक्षावर पराभवाचे खापर फोडले आहे. मला काही लोकांवर संशय असून आपण उद्धव ठाकरेंकडे तक्रार करणार आहोत, असे खैरेंनी म्हटले आहे.

मला काही लोकांवर संशय आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी मी एक-दोन दिवसांत जाणार आहे. तेव्हा त्यांना याबाबत सर्व सांगणार आहे. जर उद्धव ठाकरे यांना हे सांगितले नाही, तर पुढे विधानसभेच्या निवडणुकीत असाच धोका होईल.

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यावर निशाणा



त्यासाठी आतापासून काहीतरी करावे लागेल. छत्रपती संभाजीनगरमध्ये पक्षाचे दोन जिल्हाप्रमुख आहेत. त्यामध्ये एक जिल्हाप्रमुख आजारी होते. ते उठलेही नाहीत. त्यानंतर दुसरे जिल्हाप्रमुख हे विरोधी पक्षनेते आहेत. तेही या ठिकाणी यायचे, १० मिनिटे बसायचे आणि जायचे त्यामुळे मी एकटा पडलो, असा आरोप चंद्रकांत खैरे यांनी केला आहे.

खैरे पुढे म्हणाले, पाच आमदार फुटले, मी एकटाच काम करीत होतो हेही लक्षात आले पाहिजे. विरोधी पक्षनेते मोठे झाले आहेत. ते आणखी मोठे व्हावेत, पण त्यांनीही लक्ष द्यायला पाहिजे होते. ते जिल्हाप्रमुख आहेत. जिल्हाप्रमुखपद त्यांनी सोडले नाही. मग काम तरी करायला पाहिजे होते. हे सर्व उद्धव ठाकरे यांच्या कानावर घालणार आहे. यात मोठा रोल हा धनशक्तीचा आहे, पण ज्याची जबाबदारी त्यांनी पार पाडायला हवी होती, असे म्हणत खैरेंनी पक्षातंर्गत खळबळ उडवून दिली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेचे संदिपान भुमरे यांना ४,७६,१३० मते मिळाली आहेत, तर चंद्रकांत खैरेंना २,९३,४५० मते पडली. यावर बोलताना मनाला लागणारा पराभव आहे. मी कधीही भ्रष्टाचार केला नाही. निर्व्यसनी माणसाला नागरिकांनी मत दिली नसल्याने दुःखी झाल्याचे खैरेंनी म्हटले तसेच त्यांनी पराभवाचे खापर त्यांनी अंबादास दानवेंवर फोडले आहे.



**मुंबई : रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल खासदार सुनील तटकरे यांचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी नातवंडांसोबत केले विजयाचे सेलिब्रेशन

## साधेपणाचे होतेय कौतुक, व्हिडीओ व्हायरल



**नागपूर : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अपेक्षेप्रमाणे विजय मिळवला. या विजयानंतर गडकरींना आपल्या घरगुती सेलिब्रेशनचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओतील साधेपणा अनेकांच्या मनाला स्पर्शून गेला आहे.

केंद्रीय मंत्री गडकरींनी सुरुवातीला आपल्या कार्यकर्त्यांनी आणलेला केक कापून विजय साजरा केला, पण त्यानंतर अत्यंत घरगुती वातावरणात आपल्या नातवंडांसह वेळ घालवून आपले यश सेलिब्रेट केले. गडकरींनी सोशल मीडियावर 'आजोबाच्या विजयाने नातवंडदेखील खुश' असे कॅप्शन देत पोस्ट केलेल्या व्हिडीओत त्यांची नातवंडे लाडक्या आजोबांच्या भोवती घोळका करून बसलेली दिसतात. फोटोसाठी पोज देऊन झाल्यावर मग एक चिमुकली मागून आबा जिंकले असे म्हणते आणि उपस्थितांमध्ये हास्य पसरते. गडकरीसुद्धा यावर स्मित करतात. या व्हिडीओमधील साधेपणा नेटकऱ्यांना खूप भावला आहे.

कुठलाही गाजावाजा नाही, कुठेही अतिरेक नाही, त्यांचा साधेपणा स्वतःवरील व कामावरील विश्वास दाखवतो अशा कमेंट्ससह हा व्हिडीओ शेअर केला जात आहे. निकालाची आकडेवारी पाहिल्यास गडकरी यांनी सुरुवातीपासून आघाडी घेतली होती. मतमोजणीच्या सर्व फेऱ्या संपताना त्यांना सहा लाख ५५ हजार २७ मते प्राप्त मिळाली. गडकरींनी एक लाख ३७ हजार ६०३ मतांनी काँग्रेसच्या विजय ठाकरे यांचा पराभव केला आहे.

## ब्लड रिपोर्टमध्ये फेरफारप्रकरणी दोन आरोपींना पोलीस कोठडी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणातील आरोपी मुलाच्या ब्लड रिपोर्टमध्ये फेरफार प्रकरणात मुंबईतून अटक करण्यात आलेल्या दोघांनाही न्यायालयाने सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अश्फाक मकानदार आणि अमर गायकवाड अशी या आरोपींची नावे असून त्यांना १० जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ब्लड रिपोर्ट फेरफार करण्यासाठी ससून रुग्णालयातील डॉक्टरांना अश्फाक व अमर यांनी तीन लाख रुपये दिले होते, अशी माहिती समोर आली आहे. अटकेनंतर त्यांना कोर्टात हजर केले असता १० जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी रायगड सज्ज

**महाड : प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही ६ जून रोजी किल्ले रायगडावर हिंदवी स्वराजाचे संस्थापक तथा आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा होत आहे. यंदाच्या या ३५१व्या सोहळ्याकरिता शिवभक्तांच्या सोयीसुविधांसाठी प्रशासनामार्फत जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गड परिसरात १४०० पोलीस तैनात असणार आहेत.

किल्ले रायगडावर अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या माध्यमातून शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. वर्षागणिक या सोहळ्यास शिवभक्तांची गर्दी वाढतच चालल्याचे दिसून येते. त्यामुळे गडावर आणि परिसरामध्ये प्रशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधा अपुऱ्या



पडू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गेले काही दिवस प्रशासनामार्फत सातत्याने बैठका घेतल्या जात आहेत. यंदादेखील लाखो शिवभक्त गडावर दाखल होतील असा अंदाज आहे. ते लक्षात घेत प्रशासनामार्फत जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. याकरिता गडावरील विविध ठिकाणी असलेल्या तलावातील पाणी एकत्रित केले गेले आहे. त्याचप्रमाणे गडावर पिण्याच्या पाण्याची असुविधा होऊ नये म्हणून प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात पुरवण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पाण्याच्या टँकरचेदेखील नियोजन करण्यात आले आहे.

लाखो शिवभक्तांच्या वाहनांची पार्किंग करण्यासाठी प्रशासनाकडून कोंझर आणि पाचाड येथे सुविधा केलेली आहे. या ठिकाणी शिवभक्तांनी आपली वाहने पार्क करून तेथून त्यांना एसटी बसने रायगडकडे सोडण्यात येणार आहे. महाड एसटी आगाराकडून याकरिता एसटी बसेस मागवण्यात आलेले आहेत. आरोग्य विभागाची पथकेदेखील या ठिकाणी तैनात करण्यात आली आहेत. चित्त दरवाजा येथून पायी चालत जाणाऱ्या शिवभक्तांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून त्यांच्या सुविधेसाठी गडावर आणि पायरी मार्गावर वैद्यकीय पथके आणि कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. रायगड रोप वेदेखील शिवभक्तांकरिता दिवस रात्र सुरू राहणार आहे. अशा प्रकारे शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी शासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

# राज्यात शनिवारपासून पावसाचा अंदाज

**पुणे : प्रतिनिधी**

मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती आहे. बुधवारी (दि. ५) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होणे अपेक्षित होते, पण प्रत्यक्षात तो गोव्यातच अडखळला आहे. गुरुवारी (दि. ६) तळकोकणात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. शनिवार (दि. ८)पासून पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पाऊस मंगळवारी गोव्यात दाखल झाला होता. मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे बुधवारी तळकोकणात पाऊस दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. प्रत्यक्षात पाऊस गोव्यातच अडखलला आहे. सिंधुदुर्गमध्ये बुधवारी ढगाळ वातावरण तयार झाले होते. तापमानात घटही झाली आहे. सिंधुदुर्गमध्ये काही ठिकाणी हलका पाऊसही झाला. पण, तो पूर्वमोसमी होता. गुरुवारी मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**सोमवारपर्यंत (१० जून) मोसमी पाऊस विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता राज्यभरात दाखल होईल. रविवार, सोमवार आणि मंगळवारी मुंबईसह किनारपट्टी आणि पश्चिम घाटात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पुढील काही दिवस राज्यात पूर्वमोसमी पावसाचा जोर राहणार आहे.**

**–डॉ. अनुपम कश्यपी, निवृत्त शास्त्रज्ञ, हवामान विभाग.**

हवामान विभागाने शनिवारी (८ जून) आणि रविवारी (९ जून) रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापुरात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्याच्या अन्य भागातही जोरदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी रविवारपासून पुढील दोन दिवस मुंबईसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह पश्चिम घाटात जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# जूनच्या पहिल्या आठवड्यात समुद्राला येणार मोठी भरती

**मुंबई : प्रतिनिधी**

जूनच्या पहिल्या आठवड्यापासून समुद्राला मोठी भरती येणार असून या वेळी समुद्रात साडेचार मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. ५ ते ८ जूनदरम्यान दररोज समुद्रात मोठी भरती येणार आहे. या पावसाळ्यातील चार महिन्यांत एकूण २२ दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे. सगळ्यात मोठी भरती २० सप्टेंबर रोजी येणार असून यावेळी ४.८० मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत.

पालिकेने येत्या पावसाळ्यासाठी भरती – ओहोटीचे वेळापत्रक जाहीर केले असून यंदा पावसाळ्यात २२ वेळा मोठी भरती येणार आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात सलग चार दिवस मोठी भरती येणार आहे. चारही बाजूने समुद्राने वेढलेल्या मुंबईला पावसाळ्यात मोठ्या भरतीचा धोका असतो. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असला तरी साडेचार मीटरपेक्षा उंच लाटा उसळणार असतील आणि त्याचवेळी मुसळधार पाऊस कोसळल्यास पाण्याचा निचरा नैसर्गिक पद्धतीने होत नाही. त्याउलट समुद्राच्या भरतीचे पाणी पर्जन्य जलवाहिन्यांमधून शहरात शिरते. त्यामुळे सखलभागात पाणी साचते. त्यामुळे भरती–ओहोटीच्या वेळा मुंबईकरांसाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत.

### दिवस, वेळ आणि लाटांची उंची

- **गुरुवार, ६ जून दुपारी १२.०५ ४.६९ मीटर,**
- **शुक्रवार, ७ जून दुपारी १२.५० ४.६७ मीटर**
- **शनिवार, ८ जून दुपारी १.३४ ४.५८ मीटर**
- **रविवार, २३ जून दुपारी १.०९ ४.५१ मीटर**
- **सोमवार, २४ जून दुपारी १.५३ ४.५४ मीटर**
- **मंगळवार, २५ जून दुपारी १४३६ ४.५३ मीटर**

## धावत्या लोकलमध्ये महिलेचे मंगळसूत्र चोरणाऱ्या दोघांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**



धावत्या लोकलमध्ये महिला प्रवाशाच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून पळ काढल्याची घटना १५ दिवसांपूर्वी दादर रेल्वे स्थानकात घडली होती. याप्रकरणी रेल्वे गुन्हे शाखेने तपास करून दोघांना अटक केली आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

तक्रारदार मधुरा गुरव २२ मे रोजी रेल्वेच्या प्रथम श्रेणीच्या डब्यातून दादर – विरारदरम्यान प्रवास करीत होत्या. दादर रेल्वे स्थानकातून गाडी सुरू होताच अचानक एक चोराने डब्यात प्रवेश केला. क्षणातच त्याने मधुरा यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पळ काढला. महिलेने आरडाओरडा केला, मात्र तोपर्यंत चोरने पोबारा केला होता.

घटनेनंतर महिलेने मुंबई सेंट्रल लोहमार्ग पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलीस आरोपीचा शोध घेत होते. याच दरम्यान लोहमार्ग गुन्हे शाखा युनिट ६ ने समांतर तपास सुरू केला होता. रेल्वे स्थानकावरील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाच्या माध्यमातून पोलिसांनी चोराची ओळख पटवून मतीउर शेख (वय ३२) याला वाडीबंदर परिसरातून ताब्यात घेतले.

या वेळी त्याने गुन्ह्याची कबुली देत चोरलेले मंगळसूत्र एका साथीदाराकडे ठेवल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याचा साथीदार कीर्तिराम नायक (वय ५२) याला अटक केली असून त्याच्याकडून चोरलेले मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले.

# 'ग्रीन होप'तर्फे नवी मुंबईत पर्यावरण दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

संदीप नाईक यांच्या नेतृत्वात नवी मुंबईमध्ये गेल्या १९ वर्षांपासून पर्यावरण संवर्धनामध्ये भरीव काम करीत असलेल्या ग्रीन होप संस्थेतर्फे बुधवारी (दि. ५) विविध ठिकाणी वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित करून जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

रबाळे, नेरूळ आणि सीवूड्स या ठिकाणी लोकनेते आमदार गणेश नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणप्रेमी नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी जागृती फेरीदेखील काढण्यात आली.



निसर्गाशी मानवाने आजवर केलेल्या खेळामुळे उष्णतेची लाट, पूर, दुष्काळ अशी संकटे ओढवली आहेत, असे मत लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी मांडले. आपली चूक सुधारून झाडे लावून ती झाडे जगवावीत, असे आवाहन त्यांनी केले. जल, वायू आणि ध्वनी प्रदूषण करणाऱ्या घटकांचा वापर करणार नाही, असा संकल्प करण्याचा सल्लादेखील त्यांनी उपस्थितांना दिला.

जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी आपल्या संबोधनामध्ये ग्रीन होपच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेत वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती, खारफुटींचे रोपण, मागेल त्याला झाड असे अनेक उपक्रम राबविल्याची माहिती दिली. कोरोना काळातही संस्थेच्या वतीने वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहिमा असे उपक्रम घेतल्याचे ते म्हणाले.

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी आपल्या रोजच्या जीवनामध्ये आपण केलेल्या छोट्या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. मी प्लास्टिक वापरणार नाही, प्रदूषणकारी कचरा करणार नाही, असे प्रत्येकाने ठरवावे. नवी मुंबईची लोकसंख्या वाढत असताना नवी मुंबईतील हिरवळ आणि झाडांची संख्यादेखील वाढली पाहिजे.

त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने, संस्थेने झाडे लावावीत आणि ती जगवण्याची जबाबदारी उचलावी, असे आवाहन त्यांनी केले. गुणवत्तापूर्ण वृक्षारोपण आणि झाडांचे जतन गरजेचे आहे. 'मागेल त्याला झाड' हा उपक्रम वर्षभर राबवून नवी मुंबईत वृक्षारोपण चळवळ गतिमान करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कळंबोलीतून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक इसम कुठेतरी निघून गेल्याने



तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बलविंदरसिंह गुलजारसिंह बसरा (४७ रा.कळंबोली, सेक्टर ११), रंग सावळा, उंची पाच फुट ११ इंच, नाक सरळ, चेहरा उभट, मिशी बारीक, दाढी बारिक, बांधा मध्यम असून अंगात काळा, लाल व व्हाईट असा टी–शर्ट व ग्रे रंगाची नाईट पॅन्ट, पायात चप्पल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे (०२२–२७४२३०००) किंवा महिला पोलीस हवालदार रुपाली पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कुकशेतमध्ये आज श्री शनैश्वर महापूजा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

श्री शनेश्वर जयंती निमित्ताने श्री शनैश्वर महाराजांची महापूजा, महाभिषेक व महायज्ञ गुरुवारी (दि. ६) नेरूळ कुकशेत सेक्टर १४ येथील प्रसिद्ध श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात अध्यक्ष बाळाराम कान्हा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या धार्मिक वातावरणात आयोजित करण्यात आला असल्याचे निमंत्रक माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी सांगितले.

या महापुजेत दुपारी महाभिषेक, पठन, महाआरती होणार असून सायंकाळी सुश्राव्य भजन आणि भक्तांना महाप्रसादचे आयोजन कुकशेत ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले असून याचा लाभ भक्तांनी घ्यावा, असे विश्वस्त सुनील पाटील यांनी कळविले आहे.

# नवी मुंबईत आरटीओची ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आरटीओने ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई ही विशेष मोहीम हाती घेऊन सोमवारी कारवाईला सुरुवात केली, मात्र ड्रंक अँड ड्राईव्ह केसेस आढळल्या नसून इतर त्रुटी आढळलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.



नवी मुंबई शहरातील सायन पनवेल महामार्गावरील तुर्भे, बेलापूर, नेरूळ याठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. सध्या पुण्यातील ड्रंक अँड ड्राईव्ह घटनेबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. यामध्ये निष्पाप जीवांना मात्र आपल्या प्राणाला मुकावे लागले आहे. अशी घटना नवी मुंबई शहरात घडू नये याकरिता नवी मुंबई आरटीओ विभागाने ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. सोमवारी एका दिवसात तब्बल ११ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे, मात्र यामध्ये अद्याप पर्यंत एकही मध्यपान करून गाडी चालवणारे वाहन चालक आढळले नाहीत. दुचाकी, चारचाकी, टेम्पो रिक्षा इत्यादी वाहन चालकांची तपासणी करण्यात आली आहे, परंतु यामध्ये अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचा समावेश होता. विना हेल्मेट, ट्रिपल सीट, वाहन परवाना नसणे, योग्यता प्रमाणपत्र नसणे, अवैध प्रवासी वाहतूक तसेच वाहनांच्या क्षमतेपेक्षाही अधिक प्रवासी नेणे इत्यादी अवैध वाहतूक अशा वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**पुण्यातील घटनेचे पुनरावृत्ती होऊ नये याकरता नवी मुंबई शहरात ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई विशेष मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये आत्तापर्यंत कारवाई केलेल्या वाहनङ्गमध्ये ड्रंक अँड ड्राईव्ह केस आढळली नाही.**

**–हेमांगिनी पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई आरटीओ**

## देवेंद्र फडणवीस भाजपला सोनेरी दिवस आणतील

### –आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याची जी घोषणा केली आहे. त्याबाबत त्यांनी फेर विचार करावा. पराभवाची जबाबदारी घेणे हेच मुळात मोठे धैर्याचे काम आहे. ती जबाबदारी त्यांनी मोठ्या मनाने स्वीकारली आहे, मात्र त्यांनी महाराष्ट्राचा विचार करावा. त्यांच्यात फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेण्याची ताकद आहे. कमी जागा येणे हे जरी भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला दुःखदायक असले तरी, फडणवीस यांना पाहून भाजपाच्या कार्यकर्त्यांपासून, पदाधिकाऱ्यांपासून, आमदारांना स्फूर्ती मिळत असून देवेंद्र फडणवीसांनी मुख्य राजकारणातून बाहेर पडू नये असे मी त्यांना समजावले, ते भाजपला पुन्हा सोनेरी दिवस आणतील ही माझी खात्री असल्याची प्रतिक्रिया आमदार मंदा म्हात्रे यांनी दिली.

सागर बंगल्यावर जाऊन मी देवेंद्र फडणवीस यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारख्या सभा घेतल्या आहेत. त्या सभा आटपून ते वाराणसी येथे मोदींच्या प्रचाराला गेले होते कडक उन्हाळ्यात त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांचे हे परिश्रम संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहेत. त्यातून आम्हालादेखील प्रोत्साहन मिळाले होते. त्यांच्यामुळे राज्यात भाजप विधानसभेला पुन्हा सोनेरी दिवस येतील.त्यासाठी आम्हीदेखील त्यांच्यासोबत कायम आहोत. फडणवीसांनी पुन्हा एकदा घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी त्यांच्याकडे केली असल्याचे आमदार म्हात्रे यांनी सांगितले.

## केबीपी कॉलेजमध्ये पर्यावरण दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजतर्फे जागतिक पर्यावरण दिन बुधवारी (दि. ५) सेंट मेरी स्कूल वाशी येथील प्रांगणात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. या वेळी सुमारे तीनशे वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

आमची जमीन आमचे भविष्य हे ब्रीदवाक्य समोर ठेवून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये निसर्गाप्रति जाणीवजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला नवी मुंबई महापालिकेचे उपायुक्त (घनकचरा विभाग) अजय गडदे, स्वच्छता निरीक्षक सागर मोरे, लेफ्टनंट प्रा. सारंग भागवत उपस्थित होते. लेफ्टनंट प्रा सारंग भागवत यांनी 'ग्रीन हायड्रोजन: ऊर्जा आणि भविष्य या विषयावर व्याख्यान दिले.

या वेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता केली. कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



# नवी मुंबईत ठिकठिकाणी वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सर्वच विभागांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राधान्याने देशी वृक्षरोपांची लागवड करण्यासोबतच स्वच्छता मोहिमांचेही आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांमध्ये लोकसहभागावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे ठिकठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण व स्वच्छता मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक, त्यातही विशेषत्वाने महिला व विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. ज्येष्ठ नागरिकांचाही या मोहिमांमध्ये लक्षणीय सहभाग होता.



नवी मुंबई महापालिका उदयान विभागाच्या वतीने नवी मुंबईच्या जैवविविधतेत भर पडेल अशा कांचन, चिंच, मोहगना पारिजात, सिताफळ, जांभूळ, निंब, आंबा, बांबू या देशी वृक्षारोपांची लागवड करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उदयान विभागाने यावर्षी करावयाच्या वृक्षारोपणाचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार सदयस्थितीत वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या ३५ हजारांहून अधिक देशी वृक्षरोपांच्या लागवडीचे नियोजन करण्यात आले असून त्यानुसार जागतिक पर्यावरण दिनी लोकसहभागातून आठही विभाग क्षेत्रात वृक्षारोपण मोहिमा हाती घेण्यात आल्या आहेत.

यामध्ये तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळ वृक्षसंपदेने हरीत असावे या आयुक्त महोदयांच्या संकल्पनेतून येथे देशी वृक्षारोपण करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त शिरीष आरदवाड यांच्यासह उद्यान विभागाचे उपायुक्त दिलीप नेरकर, परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, तुर्भे विभागाचे सहा. आयुक्त भरत धांडे, कार्यकारी अभियंता राजेश पवार तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी सतीश पडवळ व उप प्रादेशिक अधिकारी जयंत कदम, ठाणे बेलापूर औद्योगिक संघटनेचे महाव्यवस्थापक मंगेश ब्रह्मे आणि इतर उपस्थितांच्या हस्ते याठिकाणी मोठ्या संख्येने देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली.

बेलापूर विभाग कार्यक्षेत्रातील तलया येथील कांदळवन भागात नवी मुंबई महापालिका व हेंकेल ग्रुप आणि महाविद्यालयीन एनएसएसचे विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागातून विशेष साफसफाई मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सहभागी सर्व स्वयंसेवकांनी कांदळवन क्षेत्रातील साधारणत: १०० कि.ग्रॅ. प्लास्टिक व तत्सम कचरा गोळा केला.

नेरूळ विभागात पोलीस स्टेशन समोरील जागेत लोकसहभागातून देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. यामध्ये विशेषत्वाने १५० बांबूची रोपे लावण्यात आली. सारसोळे जेट्टी येथे कांदळवन विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेत एस के कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स नेरूळ व एसआयईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज नेरूळ यांच्या एनएसएस युनिटचे विद्यार्थी स्वयंसेवक व स्वच्छ्ता दूत यांनी परिसरातील प्लास्टिक व पाण्याच्या प्रवाहात वाहून आलेले तत्सम साहित्य गोळा केले.

तुर्भे विभागांतर्गत सानपाडा क्षेत्रातील सिताराम मास्तर उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिक संघ सानपाडा तसेच बंड्स कॉलेजचे विद्यार्थी यांच्या एकत्रित सहयोगातून वृक्षारोपण करण्यात आले तसेच स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी उपस्थित नागरिकांसह माझी वसुंधरा अभियानाची शपथ घेण्यात आली.

कोपरखैरणे विभाग कार्यालय क्षेत्रात सेक्टर १४ येथील निसर्गोद्यानात २०० हून अधिक आम्र वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपणाप्रसंगी पर्यावरणप्रेमी नागरिक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घणसोली विभाग कार्यक्षेत्रात सहा. आयुक्त संजय तायडे यांच्या नियंत्रणाखाली घणसोली सेक्टर ३ येथील सेंट्रल पार्क तसेच पाम बीच रोड से.१ लगत देशी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

ऐरोली विभागातही ऐरोली विभागाचे सहा. आयुक्त अशोक आहिरे तसेच कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, उपअभियंता गजानन पुरी व बंधु शिरोसे, उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेद्र इंगळे, उद्यान सहाय्यक पुनम नवले तसेच इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत ऐरोली विभाग कार्यालय परिसरात कडूनिंबांची झाडे लावण्यात आली. त्याचप्रमाणे ऐरोली, से–१८ येथील रामदास बापु पाटील उदयानात ज्येष्ठ नागरिक संघटना, ब्रम्हकुमारी संस्था यांच्या सहयोगाने वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.

ऐरोली सेक्टर १४ येथील नमुंमपा शाळा मैदानात शालेय विदयार्थी तसेच सामाजिक पर्यावरणप्रेमी आणि सखी महिला यांच्या सहयोगाने कडुनिंबाची ५० वृक्षरोपे लावण्यात आली. पटनी रोड येथेही नेवा गार्डन सोसायटीपासून दिघ्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला १०० नग कडूनिंबच्या झाडांचे मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या सहभागातून वृक्षरोपण करण्यात आले.

दिघा विभागात तलावानजिकच्या साने गुरुजी उद्यानात परिमंडळ २चे उपआयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांच्यासह मुख्य स्वच्छता अधिकारी सतीश सनदी व इतर अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक यांच्या उपस्थितीत देशी वृक्षरोपांचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपण व स्वच्छता मोहिम पार पडलेल्या सर्वच ठिकाणी माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण रक्षण व संवर्धनाची शपथ ग्रहण करण्यात आली.

# तब्बल ३८ गुन्ह्यांतील जप्त मुद्देमाल नष्ट

## १५ वर्षांपासूनच्या साठ्याची पनवेल पोलिसांकडून विल्हेवाट

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाणेकडील सन २००८ ते २०२३ या कालावधीमधील विविध दाखल ३८ गुन्ह्यांमधील दारूच्या बॉटल, कॅन व अन्य जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मा. न्यायालयाचे आदेशाने करंजाडे येथे नाश केला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणेकडील विविध दारूबंदी गुन्हयांमध्ये ६५ ई कलमान्वये दारूच्या बॉटल, कॅन व अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयाचा तपास पुर्ण होवून आरोपीत यांचे विरूध्द मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. जप्त मुद्देमाल मोठ्या प्रमाणात असल्याने



पोलीस ठाणे मुद्देमाल कक्षामध्ये ठेवण्यास जागा अपुरी पडत होती. या गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल पोलीस ठाणे येथे दीर्घ कालावधीपासून पडून असल्याने बदलत्या हवामानाचा परिणाम होऊन नाश होत आहेत तसेच दारूचे कॅन उंदीर कुरतडून मुद्देमाल नाश होत आहे.

बदलत्या हवामानाचा परिणाम होवून उग्र वास येत होता. त्याचा परिणाम पोलीस ठाण्याकडील पोलीस अधिकारी, अंमलदार, तसेच पोलीस ठाणे येथे कामकाजाकरिता येणारे नागरीक यांच्या आरोग्यावरती होत होता. याकरिता पोलीस ठाणे कडील जप्त साठयाची लवकरात लवकर विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याने मा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, पनवेल जि. रायगड यांच्याकडून पनवेल शहर पोलीस ठाणेकडील ३८ गुन्हयामध्ये दारूचा मुद्देमाल नाश करणे बाबत आदेश प्राप्त करण्यात आले होते.

यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे त्यांच्या विशेष पथकाने पनवेल शहर पोलीस ठाणे कडील एकुण ३८ गुन्ह्यामधील ९० मिलीच्या ७६७ बाटल्या, १९८० मिलीच्या १९४२ बाटल्या, ७५० मिलीच्या १५८५ बाटल्या, ६०० मिलीच्या ८९ बाटल्या, अशा एकूण ४३७५ बाटल्या (७,५०,००० पेक्षा अधिक किंमतीचा) हा मुद्देमाल करंजाडे सेक्टर –५ या सुरक्षित ठिकाणी पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची हानी न होता तसेच अस्वच्छता न होता नाश करण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिली.

# पनवेलच्या ग्रामीण भागात ६४ कुष्ठरुग्ण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये एकूण ६४ कुष्ठरुग्णांची संख्या आहे. या सर्वांवर उपचार सुरू असल्याचे माहिती पंचायत समिती, आरोग्य विभाग पनवेल यांच्याकडून देण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे येथे १४, आपटा ३१, आजीवली १२, गव्हाण १४, वावंजे १९ असे एकूण ९० रुग्ण आहेत. सद्यस्थितीत ६४ रुग्ण आहेत.

कुष्ठरोग हा इतर रोगांपेक्षा थोडा वेगळा असला तरी लवकर निदान व योग्य उपाययोजना करून रोग बरा करणे शक्य आहे. यासाठी शासन स्तरावर उपाययोजना केल्या जात आहेत. त्वचेवर न खाजणारा व बधिर चट्टा आल्यास किंवा हातापायास मुंग्या, बधिरपणा आल्यास किंवा त्वचा लालसर चमकदार दिसू लागल्यास ताबडतोब तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करणे आवश्यक आहे. रोगाचे निदान झाले तरी घाबरण्याचे कारण नसते. यावर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. त्यामुळे कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होतो. एप्रिल २० २३ ते मार्च २०२४ पर्यंत पनवेलच्या ग्रामीण भागात एकूण ९० कुष्ठरुग्ण सापडून आले. त्यापैकी सद्यस्थितीत ६४ रुग्ण आहेत. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होतो.

यात पीबी केस असेल तर सहा महिन्यांच्या गोळ्या दिल्या जातात आणि एमबी असेल तर १२ महिने गोळ्या दिल्या जात असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली. कुष्ठरोग निर्मूलनाबाबत जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत गेल्यामुळे जनतेचा कुष्ठरोगी व्यक्तीकडे बघण्याच्या दृष्टिकोनात हळुहळू फरक पडत आहे, मात्र कुष्ठरोग हा रोग सर्वसामान्य आहे.

समाजाने कुष्ठपीडित व्यक्तींना स्वीकारावे याबद्दलची मानसिकता बदलण्यास काही काळ जावा लागेल. कुष्ठरोग हा सावकाश पसरणारा जिवाणूजन्य आजार आहे. याचा परिणाम त्वचा, हातातील आणि पायातील परिघवर्ती चेता, नाकाची अंतत्वचा, घसा आणि डोळ्यावर होतो. चेतांच्या टोकावर परिणाम झाल्याने परिणाम झालेल्या भागाची संवेदना नष्ट होते. संवेदना नाहिशी झाल्याने हाता पायाची बोटे वाकडी होतात. रोगाचे निदान झाले तरी घाबरण्याचे कारण नसते. यावर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. त्यामुळे कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होतो.

# उरण पूर्व विभागात खासदार श्रीरंग बारणेंच्या विजयाचा जल्लोष



**उरण : वार्ताहर**

उरण पूर्व विभागात खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांचा विजयी जल्लोष मंगळवार (दि. ४) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, आवरे पंचायत गण अध्यक्ष अजित पाटील, सारडे सरपंच रोशन पाटील, दिघाटी सदस्य अमित पाटील, पिरकोन सदस्य के.वाय गावंड, रायगड ओबीसी सचिव प्राध्यापक प्रमोद म्हात्रे, उरण तालुका पदाधिकारी रवी म्हात्रे, मनसे संघटक नितिन म्हात्रे, ज्येष्ठ नेते संजय जोशी, एकनाथ म्हात्रे आणि युवा नेतृत्व कल्पेश गावंड, अक्षय मोकल, निशाल गावंड, हितेश म्हात्रे, अमित म्हात्रे, आर्यन म्हात्रे, बंटी गावंड, चंद्रहास गावंड आदी उपस्थित होते.

# सिडको अग्निशमन विभागाच्या ताफ्यात अत्याधुनिक वाहने दाखल

**पनवेल : वार्ताहर**

सिडको अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दोन अत्याधुनिक वाहने दाखल झाली आहेत.

सिडको अग्निशमन विभागाची खारघर, उलवे, द्रोणागिरी, कळंबोली व नवीन पनवेल अशी पाच अग्निशमन केंद्रे कार्यन्वीत असुन, नागरीकांना २४ तास सेवा पुरवित आहेत. सिडको महामंडळाच्या परिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात उंच रहिवाशी इमारती आहेत.

याकरिता सिडको महामंडळाने High-rise Firefighting हे वाहन व अरुंद ठिकाणी आग लागल्यास किंवा रस्ता अपघात झाल्यास विमोचनाकरीता Quick Response



Vehicle अशी दोन वाहने सिडको महामंडळाने खरेदी केली असुन ३० मे पासुन या दोन्ही वाहनांचे लोकर्पण मुख्य दक्षता अधिकारी, यांच्या हस्ते करण्यात आलेले आहे.

या ठिकाणी विरेश सिंग यांनी LUF Nano Fully Electric Fire Fighting Robot चे प्रात्यक्षिकदेखील दाखविण्यात आले. त्या ठिकाणी सिडको अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशमन अधिकारी विजय राणे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे व कर्मचारी उपस्थित होते.

# चारुशीला घरत यांनी केली मान्सूनपूर्व कामांची पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत यांनी पोदी तसेच सेक्टर १५ आणि १६ परिसराची मान्सूनपूर्व कामांची पाहणी केली. या वेळी त्यांनी रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची पाहणी करून ही कामे लवकरात लवकर करण्याच्या सूचना दिल्या.

पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामे सुरू आहेत. या कामांच्या पार्श्वभुमीवर माजी उपमहापौर चारुशीला घरत यांनी पोदी नंबर २, सेक्टर १५ आणि १६ परिसराची महापालिकेच्या अभियंतासह पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये साचल्याने महापालिकेच्या अभियंत्यांना निर्दशनाला आणून देत ही कामे लवकरात लवकर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्यांनी गटार कामांचाही पाहणी करत आढावा घेतला.

# झाडे दान करून पर्यावरण दिन साजरा

## मोरे दाम्पत्याचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण भारतातीलच नाही तर संपूर्ण विश्वातील तापमान हे वाढतच आहे हे मोरे दाम्पत्यांच्या आवर्जून लक्षात येत होते. कधी पारा हा ५० डिग्रीच्या वरसुद्धा गेला होता. माणसांची, प्राण्यांची व पक्षांची सर्व उन्हामुळे लाही लाही होत होती. उष्माघातामुळे बरेच जण दगावले सुद्धा होते. त्यामुळे मोरे दाम्पत्य हे सर्व बघून अस्वस्थ होत होते. ह्या दोघांनी ठरविले की, आपणसुद्धा समाजाचे काही देणे लागतो ह्या उद्देशाने काही केले पाहिजे. मग यांनी ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित साधून झाडे दान देऊन जागतिक पर्यावरण दिन



साजरा करण्याचे ठरविले.

आज त्यांनी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फणसवाडी, केंद्र नावडे, ता. पनवेल जि. रायगड शाळेस ३ वडाचे. २ पिंपळाचे, ३ कडुलिंबाचे झाडे दान देऊन व त्यांचे प्रत्यक्षपणे वृक्षारोपण करून जागतिक पर्यावण दिन साजरा केला.

या वेळी शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या डॉ. प्रा. नीलिमा अरविंद मोरे, बँक ऑफ महाराष्ट्राचे माजी विशेष सहायक, विशेष कार्यकारी व गुणवंतकामगार अरविंद मोरे, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फणसवाडी येथील शाखा प्रमुख, स्नेहा गावंड, सहशिक्षिका सविता सरगर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वैशाली पारधी, प्रा. बिजली दडपे, नवीन पनवेलमधील बँक ऑफ महाराष्ट्रच्या माजी शाखा प्रबंधक प्रतिमा जाधव, सामाजिक कार्यकर्त्या सुमन जयवंतराव ताजने व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी अरविंद मोरे म्हणाले की, आपण समाजाचे काही देणे लागतो ह्या उद्देशाने व सुरुवात आपल्यापासून करावी या भावनेने आज हा उपक्रम राबवित आहे. आज आपण काही पर्यावरणासाठी केले तर येणाऱ्या पिढीला चांगले पर्यावरण मिळेल. झाडे लावल्यामुळे तापमान नियंत्रणात राहील. जी झाडे लावत आहेत ती जमिनीत पाणी साठवणारी, सावली देणारी व पाऊस पाडणारी आहेत. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावण्याच्या संकल्प केला पाहिजे.

प्रा. बिजली दडपे आणि प्रतिमा जाधव यांनी सुद्धा झाडे दान देऊन वृक्षारोपण केले. या वेळी स्नेहा गावंड, सविता सरगर व वैशाली पारधी यांनी झाडांची निगा घेण्याचे आश्वासन दिले. सविता सरगर यांनी सर्वांचे आभार मानले.



**करंजाडे : सुशांत पाटील, परेश पाटील यांच्या ट्रू डायग्नो या करंजाडे येथील डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, डॉ. विक्रम पाटील, सर्जेराव पाटील, निनाद पाटील, उमेश माने, प्रिया पाटील, कुणाल जंगम, रवी पांचाळ, सोहिल खान आदी उपस्थित होते.**

## इमारतीजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** शहरातील कोळी समाज इमारतीजवळ मोकळ्या जागेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, बांधा सडपातळ, डोक्याचे केस बारीक व पांढरे, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच असून, अंगात तपकिरी रंगाचा हाफ बाह्याचा टी शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा सहा.पो.निरीक्षक राजेंद्र घेवडेकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे ४८ उद्यानांमध्ये वृक्षारोपण

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने पनवेल महापालिकेच्या वतीने ४८ उद्यानांमध्ये ११०० वृक्षरोपणाचा कार्यक्रम बुधवारी (दि. ५) घेण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत खारघर सेक्टर १२ मधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके उद्यानामध्ये प्रभारी आयुक्त तथा प्रशासक डॉ. प्रशांत रसाळ, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे व लोकप्रतिनिधीच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी डॉ. प्रशांत रसाळ यांनी बोलतांना, माणूस हा निसर्गाचा पुत्र आहे. पर्यावरणाचा विकास करणे म्हणजे पर्यावरणांमध्ये ढवळाढवळ न करणे. निसर्ग आहे तसे त्याचे जतन करणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच महापालिका ११०० देशीझाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. पुढच्या पिढीला पक्षांचे आवाज ऐकवायचे असतील झाडे लावली पाहिजेत, त्यांचे जतन करायला पाहिजे, असे सांगितले.





याबरोबरच जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने महापालिकेच्यावतीने कळंबोली मधील सेक्टर ६ ई प्लॉट ०२ आय जी पी एल उद्यान येथे उपायुक्त कैलास गावडे, सेक्टर ११ नवीन पनवेल उद्यानामध्ये मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, आरोग्य निरीक्षक अरूण कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नावडे उपविभाग येथे सेक्टर ०९ मध्ये उपायुक्त बाबासाहेब राजळे, सेक्टर १५ मधील उद्यानामध्ये लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, प्रभाग अधिकारी अमर पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कामोठे येथे उपायुक्त मारूती गायकवाड, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उप अभियंता राजेश कर्डिले,आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पनवेलमध्ये सेक्टर १६ मध्ये शहर अभियंता संजय जगताप, महात्मा गांधी उद्यानामध्ये सहाय्यक स्वरूप खारगे, कल्पतरू उद्यानामध्ये लेखा परीक्षक संदीप खुरपे प्रभाग अधिकारी रोशन माळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या शिवाय इतर राहिलेल्या उद्यान्यांमध्ये वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

### विविध सामाजिक संस्थांचे सहकार्य

या वृक्षारोपण कार्यक्रमांसाठी महापालिका कार्यक्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांनी सहकार्य केले. यामध्ये खारघरमध्ये इन्फिनीटी संस्था, पोदार प्रेप, पनवेलमध्ये भारत विकास परिषद, कळंबोली येथे 'आई' शैक्षणिक व सामाजिक संघटना, कामोठेमध्ये पर्यावरण प्रेमी ग्रुप यांचे सहकार्य महापालिकेस मिळाले तसेच ट्युलिप अंतर्गत इंटर्नशिपसाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी खारघर उद्यानामध्ये 'पर्यावरणाचे रक्षण' या विषयावर लघुनाटिका सादर केली.

या वृक्षारोपणासाठी खास भारतीय प्रजातींची म्हणजेच वड, पिंपळ, कडूनिंब, ताम्हणफूल, नांद्रुक, आकाशनिंब, बहावा, अर्जुन, बिट्टी, अर्जुन, जांभूळ, करंज, पळस, प्राजक्त, सोन चाफा, अशोक, सप्तपर्णी, कुसूम, बकुळ, कदंब शिसव, सुबाभूळ, नारळ, सिता अशोक, शमी, आपटा अशी झाडे निवडण्यात आली होती. या वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत खारघार व नावडे प्रभागातील उद्यानांमध्ये ५११, कामोठ्यातील सात उद्यानांमध्ये ८३, पनवेल शहर व न्यू पनवेल मधील अठरा उद्यानांमध्ये १६६, कळंबोली व खांदा कॉलनीतील १६ उद्यांनामध्ये ३३६ झाडांचे रोपण करण्यात आले.


## संपादकीय

# तिसऱ्या कार्यकाळाची तयारी

आपल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारने हिमतीने अनेक मोठे निर्णय घेतले व अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या. त्यामुळेच जनतेने सलग तिसऱ्यांदा एनडीएवर सरकार स्थापनेसाठी विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे गेल्या दशकभरात सुरू असलेले चांगले काम पुढे सुरू ठेवू याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी जनतेचे आभार मानत दिली आहे. त्यानंतर बुधवारी सरकार स्थापनेच्या हालचालींनी वेग घेतल्याचेही दिसून आले.

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. लोकसभेच्या ५४३ जागांपैकी भाजप २४०, तर काँग्रेसने ९९ जागा जिंकल्या आहेत. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीला २९२ तर इंडिया आघाडीने २३४ जागांवर विजय मिळवला आहे. त्यामुळे देशात पुढील सरकार हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचेच असेल हे स्पष्ट झाले आहे. निकालानंतर मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत १७वी लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस करण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या निकालांवर प्रतिक्रिया व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे सलग तिसऱ्यांदा सरकार बनणार हे निश्चित आहे असा ठाम विश्वास व्यक्त केला. देशवासीयांनी भाजपवर, एनडीएवर विश्वास दाखवला आहे. हा देशाच्या १४० कोटी जनतेच्या विश्वासाचाच विजय आहे, असेही मोदी म्हणाले. निकालानंतर राजधानी दिल्लीतील भाजपच्या मुख्यालयात पोहचून मोदींनी कार्यकर्त्यांना संबोधितही केले. या वेळी बोलताना त्यांनी सर्वप्रथम निवडणूक आयोगाचे अभिनंदन केले. निवडणूक प्रचारादरम्यान व मतदानाच्या विविध टप्प्यांचे वेळी निवडणूक आयोगाच्या भूमिकेविषयी विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले होते. त्या पार्श्वभूमीवर मोदींनी जगातील सर्वात मोठी निवडणूक इतक्या सक्षमपणे पार पाडल्याबद्दल आयोगाचे अभिनंदन केले. इतक्या कडक उन्हात मतदान कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य बजावल्याचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. लोकशाहीचे यश सर्वांच्या सहभागाशिवाय शक्य नाही हे अधोरेखित करीत त्यांनी सर्व पक्षांचे व देशभरातील सर्व उमेदवारांचेही अभिनंदन केले. विशेषत्वाने जम्मू-काश्मीरमधील मतदारांनी विक्रमी मतदान करून जगभरात भारताची बदनामी करणाऱ्यांना आरसा दाखवला असल्याचेही मोदी म्हणाले. आपले दोन कार्यकाळ पूर्ण करून तिसऱ्यांदा पुन्हा सत्तास्थानी परतणारे मोदी सरकार हे १९६२नंतरचे पहिलेच सरकार आहे. देशभरात जिथे जिथे विधानसभा निवडणुका झाल्या तिथे तिथेही एनडीएला मोठे यश मिळाले आहे. यात आंध्र प्रदेश, ओडिशा, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश यांचा समावेश आहे. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शासकीय निवासस्थानी एनडीएच्या घटकपक्षांची बैठक पार पडली. या बैठकीला टीडीपीचे अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू, जेडीयूचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चिराग पासवान उपस्थित होते. या बैठकीत सर्वानुमते अधिकृतपणे नरेंद्र मोदी यांची एनडीएचा नेता म्हणून निवड करण्यात आली. एनडीएचे शिष्टमंडळ बुधवारीच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे जाऊन सत्तास्थापनेचा दावा करेल असे सांगितले जात होते. याच बैठकीत एनडीएच्या नेत्यांनी महिला, गरीब, तरुण, शेतकरी यांसह समाजातील सर्व वंचित घटकांना मदत करण्याचा ठराव मंजूर केला. विकासाचे फायदे देशाच्या कानाकोपऱ्यातील गरीब व वंचित लोकांपर्यंत पोहचविण्याकरिता एनडीएचे सरकार कटिबद्ध असेल. त्याकरिताच आघाडीतील घटकपक्षांच्या मंजुरीने हा ठराव संमत करण्यात आला आहे. एनडीएच्या नव्या सरकारचे भविष्यातील कार्यक्रम व उपक्रमांसाठी हा ठराव मार्गदर्शक ठरेल हे निश्चित.**

# छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा



रायगडावर इ.स. ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा गागाभट्ट यांनी राज्याभिषेक झाला. सोहळ्यासाठी ३२ मण सोन्याचे सिंहासन बनवले गेले होते. शिवराज्यभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून ब्राह्मणांना आमंत्रण देण्यात आले होते. सुमारे ११००० ब्राह्मण आणि इतर लोक मिळून जवळपास लाखभर लोक रायगड या ठिकाणी जमा झाले होते. यंदाही या सोहळ्याची रायगडावर प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा भव्य दिव्य झाला. तेव्हाच्या काळात राज्याभिषेक सोहळ्यासाठी चार महिने पाहुण्यांची राहण्याची व्यवस्था, स्वादिष्ट भोजन अशी तयारी केली जात असे. या सोहळ्यात ब्राह्मण, श्रीमंत गणमान्य व्यक्ती. दुसऱ्या राज्यांचे प्रतिनिधी, विदेशी व्यापारी आणि सामान्य जनता असे सर्वच उपस्थित झाले होते. या सोहळ्यासाठी साडेचार हजारा राजांना निमंत्रणे गेली होती.

राज्याभिषेकापूर्वी महाराजांनी विविध मंदिरांत जाऊन देवर्शन केले. सव्वा मण सोन्याची छत्री भवानी मातेस अर्पण केली. नंतर २१ मेपासून ते रागयगडावर धार्मिक विधीत गुंतून गेले. महाराजांनी २८ मे रोजी प्रायश्चित्त केले, जानवे परिधान केले. दुसऱ्या दिवशी दोन राण्यांबरोबर पुन्हा विवाह विधी केला. दुसऱ्या दिवशी महाराजांची सोने, चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे, लोखंड अशा सात धातूंनी वेगवेगळी तुला झाली. याशिवाय वस्त्र, कापूर, मीठ, खिळे, मसाले, लोणी, साखर, फळे इत्यादींच्या तुला झाल्या. लाखभर होन ब्राह्मणांना देण्यात आले.

राज्याभिषेकच्या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, प्रमुख ब्राह्मणांच्या पायी पडून राज्याभिषेक सुरू झाला. या वेळी शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचावर शिवाजी महाराज बसले. आठ प्रधान नद्यांतून आणलेल्या पाण्याने शिवाजीमहाराजांबर अभिषेक केला गेला. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर शिवाजीने लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणि धनुष्यबाणाची पूजा केली. मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला.

दालन ३२ शकुन चिन्हांनी सजवलेले होते. शिवाजी महाराज ३२ मण सोन्याच्या सिंहासनावर आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. 'शिवराज की जय' शिवराज की जय'च्या घोषणा दिल्या गेल्या. सोन्याचांदीचे फुले उधळली गेली. विविध तालवाद्य-सूरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून आशीर्वाद दिला. या निमित्ताने खूप दानधर्मदेखील केला गेला.

राज्याभिषेक झाल्यानंतर शिवरायांनी शिवशक ही नवीन कालगणना सुरू केली. आजही शिवशक ही कालगणना अस्तित्वात आहे. या कालगणनेमागे राजांचा दूरदृष्टीचा महत्त्वपूर्ण गुण दिसून येतो.

शिवराज्याभिषेकानंतर महाराजांनी शिवराई व होन या दोन चलनाची निर्मिती केली. शिवराई ही चांदीची नाणी व होन ही सोन्याची नाणी चलनात आणली. राजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी ही चलन निर्मिती केली. शिवरायांनी राज्याभिषेक झाल्यानंतर राज्यकारभारासाठी मराठी भाषेचा वापर केला. मराठी भाषेस महत्त्व दिले. परकीय भाषा वापरण्यापेक्षा आपली मातृभाषा महाराजांनी राज्यकारभारात वापरली. यातून महाराजांचे भाषा प्रेम दिसून येते....

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही ६ जून रोजी किल्ले रायगडावर हिंदवी स्वराजाचे संस्थापक तथा आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा होत आहे. यंदाच्या या ३५१व्या सोहळ्याकरिता शिवभक्तांच्या सोयीसुविधांसाठी प्रशासनामार्फत जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गड परिसरात सुमारे पोलिसांसह अन्य कर्मचारी तैनात असणार आहेत.

किल्ले रायगडावर अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या माध्यमातून शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. वर्षागणिक या सोहळ्यास शिवभक्तांची गर्दी वाढतच चालल्याचे दिसून येते. त्यामुळे गडावर आणि परिसरामध्ये प्रशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गेले काही दिवस प्रशासनामार्फत सातत्याने बैठका घेतल्या जात आहेत. यंदादेखील लाखो शिवभक्त गडावर दाखल होतील असा अंदाज आहे. ते लक्षात घेत प्रशासनामार्फत जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. याकरिता गडावरील विविध ठिकाणी असलेल्या तलावातील पाणी एकत्रित केले गेले आहे. त्याचप्रमाणे गडावर पिण्याच्या पाण्याची असुविधा होऊ नये म्हणून प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात पुरवण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पाण्याच्या टँकरचेदेखील नियोजन करण्यात आले आहे.

लाखो शिवभक्तांच्या वाहनांची पार्किंग करण्यासाठी प्रशासनाकडून कोंझर आणि पाचाड येथे सुविधा केलेली आहे. या ठिकाणी शिवभक्तांनी आपली वाहने पार्क करून तेथून त्यांना एसटी बसने रायगडकडे सोडण्यात येणार आहे. महाड एसटी आगाराकडून याकरिता एसटी बसेस मागवण्यात आलेले आहेत. आरोग्य विभागाची पथकेदेखील या ठिकाणी तैनात करण्यात आली आहेत. चित्त दरवाजा येथून पायी चालत जाणाऱ्या शिवभक्तांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून त्यांच्या सुविधेसाठी गडावर आणि पायरी मार्गावर वैद्यकीय पथके आणि कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. रायगड रोप वेदेखील शिवभक्तांकरिता दिवस रात्र सुरू राहणार आहे. अशा प्रकारे शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी शासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

या सोहळ्यासाठी दोन हजार पोलीस किल्ले रायगड आणि परिसरामध्ये तैनात राहणार आहेत, तर ७०० शासकीय कर्मचारी आणि १२० स्वयंसेवक या ठिकाणी काम करणार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्यासह दोन पोलीस उपाधीक्षक, ११ पोलीस उपविभागीय अधिकारी, २८ पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक, १४० पोलीस उपनिरीक्षक, ९०० पोलीस कर्मचारी, १३५ वाहतूक पोलीस तसेच पोलीस दलाची विविध पथके या ठिकाणी दाखल होणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा त्रिवार मुजरा. शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# कवयित्री आणि लेखिका शांता शेळके



## निमित्त

ख्यातनाम मराठी लेखिका, कवयित्री, अनुवादक व गीतकार अशी शांता जनार्दन शेळके यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी इंदापूर (जि. पुणे) येथे झाला. खेड, मंचर या परिसरात त्यांचे बालपण व्यतीत झाले. आज शांताबाईंचा स्मृतीदिन आहे.

शांताबाईंचे आजोबा (वडिलांचे वडील) अण्णा हे शाळामास्तर होते. शांताबाईंचे वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. त्यांच्या बदलीच्या नोकरीमुळे चिखलदरा, नांदगाव, खर्डी या गावातही शांताबाईंना वास्तव्य करावे लागले. त्यांच्या वडिलांना त्या दादा आणि आईला (अंबिका वहिनी) वहिनी म्हणत असत. एकूण ही पाच भावंडे त्यात शांताबाई सगळ्यात मोठ्या. आईच्या मृदू स्वभावाचे, तिच्या चित्रकलेचे, तिच्या वाचनवेडाचे संस्कार कळत-नकळत शांताबाईंवर होत राहिले. लहानपणी आजोळी गेल्यावर विविध पारंपरिक गीते, ओव्या, श्लोक त्यांच्या कानावर पडत. त्यामुळे कवितेची आवड, वाचनाची आवड, त्या संस्कारक्षम वयात रूजत गेली. १९३०मध्ये शांताबाईंच्या वडिलांचे निधन झाले त्या वेळी त्या नऊ वर्षांच्या होत्या. चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते.

यानंतर सारेजण पुण्याला काकांकडे आली. अखेर पुढील शालेय शिक्षण पुण्याच्या हुजुरपागेत झाले. सुसंस्कृत सुविद्य, अभिजात अशा या शाळेतील वातावरणाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. १९३८मध्ये त्या मॅट्रीक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बीए झाल्या. प्रा. श्री. म. माटे, प्रा. के. ना. वाटवे, प्रा. रा. श्री. जोग यांच्यामुळे अभ्यासाच्या पुस्तकाव्यतिरिक्त अवांतर वाचनाची, कवितेची गोडीही वाढत राहिली. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख, लिहू लागल्या. बीए झाल्याबरोबर मुक्ता आणि इतर गोष्टी नावाचा त्यांचा एक कथासंग्रहही निघाला. याला प्रा. माटेसरांनी प्रस्तावना लिहिली. १९४४मध्ये संस्कृत घेऊन शांताबाई एमए झाल्या. या परीक्षेत त्यांना तात्यासाहेब केळकर सुवर्णपदक मिळाले. एमए झाल्यावर सुरुवातीला त्यांनी आचार्य अत्रे यांच्या समीक्षक मासिकात, नंतर नवयुग या अत्र्यांच्या साप्ताहिकात आणि दैनिक मराठात दोनतीन वर्षे काम केले. विविध प्रकारच्या लेखनाच्या अनुभवाची शिदोरी त्यांना येथे मिळाली. अनेक साहित्याविषयक गोष्टी त्यांना इथे शिकायला मिळाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रूईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

विविध साहित्यप्रकारात विहार करूनही त्यांच पहिलं व खरं प्रेम राहिलं ते कवितेवरच. हळूवार भावकवितेपासून नाट्यगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते, चित्रपटगीते, प्रासंगिक गीते अशा विविध रूपातून त्यांची कविता आपल्याला भेटत असते. विविध पुरस्कार त्यांना लाभले आहेत. त्याबरोबरच १९९६मध्ये आळंदी येथे भरलेल्या ६९व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. ६ जून २००२ रोजी त्या निर्वतल्या. (साभार : इंटरनेट)

## क्लिक...क्लिक...!



**खालापूर : मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत वावंढळ गावच्या हद्दीत एक होर्डिंग आडवे झाले आहे. सुदैवाने त्याची उंची कमी होती. अन्यथा एखाद्या वाटसरू अथवा गाडीवर पडले असते. अद्यापही ते तिथे तसेच पडून आहे.** (छाया : अर्जून कदम)



## बदलते तंत्रज्ञान

# आधार कार्ड असे करा स्वत:च अपडेट





युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाने आधार कार्ड ऑनलाइन अपडेट करण्याची अंतिम मुदत १४ जूनपर्यंत वाढवली आहे. याचा अर्थ भारतीय रहिवाशांना त्यांच्या ओळखीचा पुरावा आणि पत्त्याचा पुरावा अपडेट करण्यासाठी जवळपास १० दिवस शिल्लक राहिले आहेत. आधार नोंदणी आणि २०१६च्या अपडेट नियमानुसार व्यक्तींनी त्यांचे पीओआय आणि पीओए डॉक्युमेंट्री त्यांच्या आधार नोंदणी तारखेपासून दर दहा वर्षांनी अपडेट केले पाहिजेत. ही आवश्यकता ५ आणि १५ वर्षांच्या मुलाच्या ब्लू आधार कार्डवर बायोमेट्रिक माहिती अपडेट करण्यासाठी देखील लागू होते. विशेष म्हणजे तुम्ही नाव, पत्ता, जन्मतारीख/वय, लिंग, मोबाइल नंबर, ई-मेल पत्ता, नात्याचा पुरावा आदी लोकसंख्याशास्त्रीय माहिती अपडेट करू शकता.

**अशी करा प्रक्रिया**

यूआडी वेबसाइटवर जा- युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या uidai.gov.inच्या वेबसाइटला भेट द्या. तुमची भाषा निवडा. माय आधार टॅबवर क्लिक करा आणि ड्रॉपडाउन मेनूमधून 'तुमचा आधार अपडेट करा' हा पर्याय निवडा. पर्याय निवडल्यानंतर तुमच्या समोर 'अपडेट आधार डिटेल्स ऑनलाइन' हे पेज दिसेल. त्यानंतर डॉक्युमेंट अपडेटवर क्लिक करा. नंतर तुमचा यूआयडी क्रमांक आणि कॅप्चा कोड एंटर करा. त्यानंतर तुमचा नोंदणीकृत मोबाइल नंबर टाका. पासवर्ड प्राप्त करण्यासाठी 'ओटीपी पाठवा'वर क्लिक करा. ओटीपी आल्यानंतर तो तेथे टाका आणि लॉग इन वर क्लिक करा. तुम्हाला अपडेट करायचे असलेले (नाव, पत्ता, जन्मतारीख इ.) पर्याय निवडा आणि नवीन माहिती अचूक भरा. सबमिट करा आणि डॉक्युमेंट अपलोड करा - एकदा तुम्ही आवश्यक बदल केल्यानंतर, सबमिट करावर क्लिक करा आणि आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करा. सबमिट अपडेट रिक्वेस्टवर क्लिक करा. तुमच्या विनंतीच्या स्थितीचा मागोवा घेण्यासाठी तुम्हाला एसएमएसद्वारे अपडेट विनंती क्रमांक (यूआरएन) प्राप्त होईल. लॉग इन केल्यानंतर आधारकार्डाची संपूर्ण माहिती तुमच्यासमोर असेल.

पडताळणीसाठी कोणतेही आवश्यक डॉक्युमेंट सबमिट करा. तुमच्या बायोमेट्रिक अपडेटच्या स्थितीचा मागोवा घेण्यासाठी तुम्हाला यूआरएनसह पोचपावती मिळेल.

## आरोग्य प्रहर

# काळी मिरीची पूड मिसळून पाणी प्यायल्याने होणारे फायदे

सकाळी उठताच तुमचीही सुरुवातीची पंधरा मिनिटं शिकण्यात, चोंदलेलं नाक मोकळं करण्यात जातात का? हा फक्त तात्पुरता त्रास नसून यामुळे अत्यंत भीषण आरोग्य स्थिती उद्भवू शकते. जर तुम्ही यावर उपाय शोधत असाल, तर आरोग्य मार्गदर्शक मंजू मित्तल यांनी एक सोपा व घरगुती उपाय सुचवला आहे. मसाल्यांची राणी



म्हणजे काळी मिरी तुम्हाला या त्रासातून सुटका मिळवून देऊ शकते. काळी मिरीमधील अँटिऑक्सिडंट्स तुम्हाला त्वरित प्रभाव दाखवू शकतात.

मित्तल सांगतात की, सकाळच्या कोमट चहाच्या कपाप्रमाणे, तुम्हाला फक्त रोज सकाळी कोमट पाण्यात पाव चमचा काळी मिरी पूड मिसळून प्यायची आहे यामुळे अनियंत्रित शिंका नियंत्रणात आणण्यासाठी मोठी मदत होऊ शकते.

काळी मिरी पावडर वजन कमी करण्यास, शरीराला डिटॉक्सि करण्यास, कर्करोगापासून बचाव करण्यास आणि तुमचे आतडे आणि पोट स्वच्छ करण्यास मदत करते. या पावडरमध्ये पोटॅशियम असते जे हृदयाची गती आणि उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. काळी मिरी शरीरात लाल रक्तपेशी आणि कॅल्शियम तयार करण्यास मदत करतात. शिवाय यातील व्हिटॅमिन बी बद्धकोष्ठ, त्वचेचे आरोग्य सुधारून सुरकुत्या कमी करते.

जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ज्ञ सुषमा पीएस यांनी शेअर केले की, काळी मिरी अँटिऑक्सिडंट म्हणून काम करण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाते. वजन कमी करण्यात मदत करणे आणि कर्करोग रोखणे यासह अनेक आरोग्यविषयक फायदे या काळ्या मिरीमध्ये आहेत आहेत. त्यातील पोटॅशियम रक्तदाब आणि नाडीचे प्रमाण नियंत्रित करण्यास मदत करते आणि त्याचे डिटॉक्सिफायिंग गुण पोट आणि आतडे स्वच्छ करून शरीराला मदत करू शकतात. शिवाय, काळी मिरीमध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन बी जास्त असते आणि लाल रक्तपेशींच्या निर्मितीत योगदान देते. पण शिंका कमी व्हाव्या यासाठी काळ्या मिरीचा वापर योग्य आहे असे सांगणारे ठोस पुरावे नाहीत.

उलट मिरीच्या उग्र वासामुळे काही लोकांना शिंका येऊ शकते. काही निरीक्षणांनुसार, काळी मिरी अनुनासिक परिच्छेदातील अॅलर्जी कमी करून शिंका येणे कमी करण्यास मदत करू शकते, परंतु वैज्ञानिक पुरावे या सिद्धांताचे समर्थन करत नाहीत. सर्व गोष्टींचा विचार केला, जरी काळी मिरीचे आरोग्यासाठी अनेक फायदे असले, तरीही शिंका कमी करण्याची क्षमता पुराव्यानिशी सिद्ध झालेली नाही.

# विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा

## पनवेल महापालिकेच्या कृती दलाची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अर्भक मृत्यू व बाल मृत्यूदर कमी करणे हे राष्ट्रीय आरोग्य् आरोग्य् अभियानाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. देशात ५ वर्षांपर्यंतच्या बालकांच्या मृत्यूमागे अतिसार हे प्रमुख कारणापैकी एक आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यूचे प्रमाण उन्हाळ्यात व पावसाळ्यात जास्त असते. अतिसारामुळे होणारे बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाच्या वतीने ६ ते २१ जून विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा २०२४चे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवरती प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या मुख्यालयात नुकतीच उपायुक्त डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत शहर कृती दलाची बैठक घेण्यात आली.

या वेळी माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी डॉ. अरूण काटकर, उपजिल्हा रूग्णालयातील बालरोग तज्ज्ञ डॉ. गुडेकर, एमजीएम रूग्णालयाचे प्रतिनिधी, सर्व एएनएम उपस्थित होते.

या वेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी पावसाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवरती अतिसाराचे संभाव्य धोके ओळखून त्याची पूर्वतयारी सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकिय अधिकाऱ्यांनी करावी, यासाठीची सर्व औषधे, इतर साधनसामुग्री याचा साठा करून ठेवणे व या अनुषंगाने आशा सेविकांना ट्रेनिंग देण्याविषयीच्या सूचना दिल्या. या कार्यक्रमाची जास्तीत जास्त जनजागृती करण्याबाबत उपस्थितांना उपायुक्तांनी सूचना दिल्या.

मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी ६ ते २१ जूनदरम्यान राबविण्यात येणाऱ्या 'विशेष अतिसार नियंत्रण पंधरावडा' राबविण्यासाठी प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या सूक्ष्म आराखाड्याविषयी माहिती घेतली तसेच उच्च प्राधान्य क्षेत्रे आणि असुरक्षित समुदायांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याविषयीच्या सूचना उपस्थितांना दिल्या. याबरोबर शहरी झोपडपट्ट्या, पुरग्रस्त भाग, आरोग्य सेविका कार्यरत नसलेली उपकेंद्रे, वीट भट्टी कामगार, स्थलांतरीत मजूर आणि बेघर इत्यादी जोखीमग्रस्त घटकांवर लक्ष देण्याविषयी सूचना दिल्या.



### विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा कार्यक्रमाची उद्दिष्टे

* अतिसारामुळे होणारे बालमृत्यू कमी करणे
* अतिसार असलेल्या सर्व मुलांना ओआरएस व झिंकचे वाटप करणे
* पाच वर्षांखालील मुलांच्या अतिसार प्रतिबंध आणि व्यवस्थापनासाठी कार्य करणाऱ्यांचे समुपदेश करणे

**६ ते २१ जून विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा २०२४चे आयोजन महापालिका कार्यक्षेत्रात करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत आशा सेविकांच्या माध्यमातून सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यांच्या मार्फत घरोघरी पत्रकाचे वाटप करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठी आशा सेविकांना नागरिकांनी सहकार्य करावे.**
**-डॉ. आनंद गोसावी,**
**मुख्य वैद्यकिय अधिकारी**

नेहमीच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात पातळ शौचास होणे म्हणजे अतिसार होय. अशुद्ध पाणी, अस्वच्छ हात, अस्वच्छ अन्नाचे सेवन इत्यादी कारणांमुळे अतिसार होतो. अतिसारामध्ये शरीरातील पाणी व क्षारांचे प्रमाण कमी होऊन शुष्कता येते. अशा प्रकारच्या शुष्कतेवर वेळीच उपचार केला नाही तर त्यामध्ये त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याची शक्यता अधिक असते.

# अनंत गीतेंच्या पराभवानंतर म्हसळ्यात ठाकरे गटाला धक्का

## नगरसेविका राखी करंबेंचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा नगरपंचायतीमधील शिवसेना उबाठाच्या एकमेव सदस्या, नगरसेविका राखी करंबे यांनी उबाठा पक्षाचा राजीनामा देऊन शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. त्यांच्या सोबत त्यांचे पती अजय करंबे यांनीही शिवसेना उबाठा युवा सेनेच्या शहर अधिकारी पदाचा राजीनामा देऊन शिंदे गटात जाहीर प्रवेश केला.



आमदार भरत गोगावले आणि आमदार थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश करण्यात आला. या वेळी तालुका प्रमुख प्रसाद बोर्ले, युवासेना तालुका प्रमुख स्वप्नील चांदोरकर आणी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे स्थानिक पदाधिकारी कोणत्याही निर्णयात सामील करून घेत नसल्याने पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचे राखी करंबे यांनी सांगितले. वरिष्ठ नेते जी जबाबदारी देतील ती योग्य प्रकारे पार पडणार असल्याचे राखी करंबे यांनी सांगितले.



**पेण : रायगड लोकसभा मतदारसंघातून सुनील तटकरे यांची दुसऱ्यांदा खासदारपदी निवड झाल्याबदल राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दयानंद भगत यांनी अभिनंदन केले.** (छाया : इजाज मनियार)

# पर्यावरण दिनानिमित्त दोन हजारांहून अधिक रोपांची लागवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमीटेड आणि पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांचा संयुक्त विद्यमानाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी (दि. ५) सावरोली खारपाडा रोडवरील आंबिवली ते वाशिवली या पाच कि. मी. अंतरामध्ये रस्ताचे दुतर्फा आंबा, फणस, जांभूळ, पेरू, वड, पिंपळ आदी जातीच्या दोन हजारांपेक्षा अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ रायगडचे उप प्रादेशिक अधिकारी प्रशांत भोसले, बिर्ला कार्बन प्लांट हेड रवींद्र रघुवंशी, संजीव भनोत (रुची सोया पतंजली), योगेश गोरे व माने साहेब, निखिल भामरे, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, माजगावचे उपसरपंच राजेश पाटील, मंडळ अधिकारी, श्रीनिवास खेडकर, विठ्ठल पाचपुंड, पाठबंधारे अधिकारी संदेश मेंगल, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर मालकर, महादेव गडगे, जयवंत पाटील, रवींद्र जाधव, नरेश पाटील, रमाकांत जाधव, किशोर देवघरे, विलास कांबळे, अमित पाटील, निलेश जाधव, गुरव एमआयडीसी पाताळगंगा, लक्ष्मण मोरे बिर्ला कार्बन कंपनी, रोहित इंगळे, दर्शन पाटील आदी मान्यवरांसह बिर्ला कार्बनमधील अधिकारी वर्ग उपस्थित होते.



# चौल नाक्यावर वाहतूक कोंडी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्याच्या दक्षिण टोकाला असलेल्या चौल गावातील मुख्य नाक्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. एकाच ठिकाणी अनेक मार्ग येत असल्याने दिवसेंदिवस कोंडीची समस्या जटील होत आहे.

नाक्यावरून एक मार्ग रेवदंडा गावाकडे जातो, दुसरा रेवदंडा बाह्यवळण मार्गावरून काशीद-मुरूड व रोहा येथील औद्योगिक वसाहतीकडे जातो तर वावेमार्गे रोह्याकडेही याच मार्गावरून जाता येते. अलिबागकडे जाणारी हजारो वाहने रोज याच मार्गावरून जातात, मात्र अनेकदा पर्यटनासाठी येणाऱ्यांना रस्तांची पुरेशी माहिती नसल्याने गोंधळाची स्थिती निर्माण होत रस्त्याच्या दुतर्फा रांगा लागतात. अवजड वाहने किंवा एसटी समोरासमोर आल्या तर कोंडीत आणखी भर पडते.

सुटीच्या दिवशी पर्यटक मोठ्या संख्येने येत असल्याने वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे रेवदंडा पोलिस ठाण्यामार्फत वाहतूक नियंत्रक नेमण्यात येतो. चालकांनी रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज घेउन वाहने चालवावी तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होईल, अशा ठिकाणी वाहने उभी करू नयेत, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे आवाहन सहायक पोलिस निरीक्षकांकडून करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भिंगार, तहसील-पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. बबन मुकुंद गायकर यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे भिंगार, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र: लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे. आर. प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|---|
| ११२ | ३ | ०-२८-३० | ०-०२-६० | ०-३०-९० | ६.६२ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार,फरोक्त,पोटगी,वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

सही /-
ॲड.स्वप्निल व्यं जाधव
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०५/०६/२०२४

**कार्यालयीन पत्ता**
बी.१०२,पहिला मजला,श्री दत्तराज सोसायटी,जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६


# कर्जतमध्ये आरपीआयतर्फे श्रीरंग बारणे यांच्या विजयाचा जल्लोष

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाच्या १८व्या लोकसभेसाठी निवडणूक पार पडून त्याचे निकाल काल ४ जून रोजी घोषित करण्यात आले. मावळ लोकसभा मतदारसंघ हा राज्यात चर्चेचा मतदारसंघ होता कर्जत आरपीआयच्या वतीने बुधवारी (दि. ५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ फटाके वाजवून पेढे भरून आनंदोत्सव कार्यकर्त्यांनी आरपीआयचे कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर यांच्या नेतृत्वाखाली साजरा करण्यात आला कर्जतमध्ये मोठा जल्लोष केला.

या वेळी आरपीआय कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर, कर्जत महिला शहराध्यक्ष वैशाली भोसले, कर्जत खालापूर विधानसभा अध्यक्ष किशोर गायकवाड, तालुका युवक अध्यक्ष अमर जाधव, तालुका युवक सचिव प्रवीण गायकवाड, उमरोली जिल्हा परिषद वार्ड अध्यक्ष संदीप गायकवाड, तालुका माजी सचिव मनोज गायकवाड, कर्जत शहर सचिव सुनील सोनवणे, संतोष जाधव, अशोक गायकवाड, दीपक गायकवाड, विजय जाधव, सचिन गायकवाड, युवा नेते अलोक डाळिंबकर उपस्थित होते. फटाक्यांची आतिषबाजी विजय उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या घोषणा देत करत एकमेकांना पेठे भरवत हा जल्लोष साजरा केला.



# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि. ४) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ७८ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. यामध्ये सीटबेल्ट न लावणे, हेल्मेट न घालणे असे विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी पोलिसांनी या वाहनचालकांकडून ८४ हजार रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

दरम्यान, वाहनचालकांना वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्यासंदर्भात आवाहनही पोलिसांनी केले आहे.


## MAHATRANSCO e-TENDER NOTICE –

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-06/ 24-25 7000031213 | Work of stub strengthening of 220kV Apta - Uran - 1 and 2 D/C line and 220kV Apta - Uran & 4 D/C line of open foundation (Normal ) under EHV lines S/Dn. Panvel under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Fee- Rs. 500/-+ GST** | Rs.71.12 Lakhs |
| Tend-07/ 24-25 7000031012 | Scheme for replacement of existing old equipments at 220kV Mahad S/stn and 100kV Roha S/stn. under EHV (O&M) Division Mahad. **Tender Fee - Rs. 5000/-+ GST** | Rs. 175.03 Lakhs |

**EMD 1% of estimated cost, submission of bids from 04.06.2024 to 12.06.2024 at 11:00 hrs, Opening date: 12.06.2024 at 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131.
E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत जमिन मालक **श्री. गोकुळ गणपत सामंत व श्री. भरत बाळाराम म्हसकर** यांच्याकडून विकसनास घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे - रीस, तालुका - खालापूर, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | रु. पै. आकार |
|---|---|---|
| १२३/७/क | ०-३४-००<br>पो.ख. ०-०६-००<br>**एकूण ०-४०-००** | ०.९३ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०५/०६/२०२४.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१



## MAHATRANSCO SRM E –TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E -Tender-17/2024-25Dtd.06.06.2024 **RFx No.**7000031350 | **Sub.: -** Invitation SRM E-tender for the work of attending emergency breakdown and planned maintenance activities of various 220 KV /100 KV EHV line under KTL S/Dn., Mahad under EHV(O&M) Dn., Mahad for the year 2024-25. | **Rs. up to 25,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 06.06.2024 @ 00:00 hrs to 12.06.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**~Sd~**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn., Mahad**



## MAHATRANSCO e-Tender NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | e-Tender-08/24-25 /7000031298 | Providing 21 No of Skilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for F.Y. 2024-25 | **Rs 48,64,768.58/-** | **11.06.2024 up to 23:59 hrs** |
| 2. | e-Tender-09/24-25 /7000031301 | Work of Providing 2 no of skilled labour (LDC cum computer operator) & 2 no unskilled labour (peon) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2024-25 | **Rs 8,66,241.11/-** | **11.06.2024 up to 23:59 hrs** |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

# नवी मुंबईत कांदळवनांची होतेय कत्तल

## ▌ पर्यावरणप्रेमींची तक्रार ▌ महसूल व मँग्रोव्ह सेलच्या पथकाकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईला खाडी किनारा लाभला आहे. या खाडीकिनारी असलेल्या कांदळवनामुळे शहराची पुरापसून सुरक्षितता होत आहे, मात्र सध्या या खाडी किनारी असलेल्या जागादेखील भुमाफियांच्या डोळ्यात खुपत असून, त्या बळकावण्यासाठी थेट कांडळवनांची कत्तल केली जात आहे. नवी मुंबईच्या पाम बीच रोडलगतच्या परिसरात खारफुटीची कत्तल थांबता थांबत नसून, भूमाफियांनी आता शेतीच्या नावाखाली खारफुटीच्या झाडांची कत्तल चालविली असल्याची तक्रार पर्यावरणप्रेमींनी मँग्रोव्ह सुरक्षा ॲपवर केली होती. त्याची दखल घेऊन महसूल आणि मँग्रोव्ह सेलच्या पथकाने या परिसराची पाहणी केली.





या पाहणी पथकात बेलापूरचे तलाठी ईश्वर जाधव आणि मँग्रोव्हज सेलचे संदीप रोकडे यांचा समावेश होता. एनआरआय वसाहत आणि अमय सोसायटीच्या मागील बाजूस खारफुटीची कत्तल चालविली असल्याची पर्यावरणप्रेमी सुनील अगरवाल यांची तक्रार होती. सध्या नवी मुंबईतील पाम बीच रोडलगतच्या जमिनीकडे मोठमोठे विकासक नजर लावून बसले आहेत. कांदळवनांच्या आत नर्सरी थाटून तसेच लहान सहान दारूचे अड्डेदेखील बनवले जात आहेत. त्यातून महिन्याकाठी लाखो रुपये कमाई केली जात आहे तसेच झोपड्यादेखील बांधल्या जात आहेत. काहीजण शेतीच्या नावाखाली खारफुटीची कत्तल करीत आहेत. याबाबत अगरवाल यांनी सातत्याने आवाज उठवून हे प्रकार रोखण्यासाठी विविध स्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

### विकसक उठले शहराच्या मुळावर

***एकीकडे सुरू झालेली मेट्रो, तयार असलेली नेरूळ जेट्टी, काही वर्षांत तयार होणारा आंतरराष्ट्रीय विमानतळ पाहता, नवी मुंबई पनवेल, उरणच्या जमिनींना पुन्हा चांगले भाव आले आहेत. त्यामुळे एकीकडे मध्यमवर्गीयांसाठी वसवलेल्या नवी मुंबईत आता मोठ मोठे प्रकल्प आणण्याची तयारी सुरू झाली आहे. खाडीकिनारी नव्हे; तर थेट खाडीत हे प्रकल्प उभारले जाणार असल्याने नवी मुंबईतील सर्वाधिक दर या घरांना प्राप्त होणार आहेत. त्यामुळे थेट शहराच्या सुरक्षिततेवर विकसक उठले असून शहराला सुरक्षित ठेवणाऱ्या कांदळवनांना लक्ष्य केले जात आहे.***

नवी मुंबई महापालिकेने नुकताच विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यात फ्लेमिंगो पक्ष्यांचा अधिवास असलेला डीपीएस तलाव आणि एनआरआय पाणथळींवर निवासी आणि वाणिज्यिक वापर दर्शविला आहे. याविरोधात शहरवासीयांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शहराला एकही पर्यटनस्थळ नसताना, फ्लेमिंगोच्या रुपात असलेले पर्यटनदेखील संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

जागा बळकावण्यासाठी भूमाफियांकडून खारफुटीची कत्तल सुरूच आहे. यंदा होणारी खारफुटीची कत्तल ही दरवर्षीपेक्षा अधिक असल्याचे बोलले जात आहे. याकडे शासकीय यंत्रणांनी पूर्णत: दुर्लक्ष केले असल्याचा आरोप करून अगरवाल यांनी मँग्रोव्ह सुरक्षा पवर तक्रार केली होती. त्यावर महसूल-वने आणि पर्यावरण विभागाने आम्ही लवकरच कार्यवाही करू, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार बेलापूरचे तलाठी ईश्वर जाधव आणि मँग्रोव्हज सेलचे संदीप रोकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आपला अहवाल ते लवकरच सादर करणार आहेत.

## हप्ता देण्यास नकार देणाऱ्या तृतीयपंथीयांवर जीवघेणा हल्ला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील घणसोली परिसरातील एका रस्त्यावर काही तृतीयपंथीय भिक्षा मागत होते, मात्र येथे भिक्षा मागायची असले तर हप्ता द्या असे स्थानिक गुंडांची मागणी फेटाळताच तीन तृतीयपंथी व्यक्तींना बेदम मारहाण करत हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना बेड्या ठोकल्या असून एका आरोपीचा शोध घेतला जात आहे. योगेश उर्फ परशुराम नीलकंठ, प्रतीक कांबळे व त्यांचा अन्य एक साथीदार असे यातील आरोपींची नावे आहेत. ठाणे बेलापूर मार्गावरील घणसोली स्टेशन समोर काही तृतीयपंथी भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. नेहमी प्रमाणे २ तारखेलाही तीन तृतीयपंथी व्यक्ती भिक्षा मागत असताना त्या ठिकाणी आरोपी एका दुचाकीवर आले. आरोपींनी त्या तृतीयपंथी व्यक्तींना आरोपींनी आडवले आणि या ठिकाणी भिक्षा मागायची असेल तर आम्हाला हप्ता द्यावा लागेल अशी दमदाटी सुरू केली, मात्र त्याला नकार देताच ज्या तृतीयपंथी व्यक्तीने नकार दिला त्याला बेदम मारहाण सुरू केली.

इतर तृतीयपंथी व्यक्तींनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही मारहाण केली गेली. त्यातील एकावर आरोपींनी चाकूचे वार केले. एवढ्यावर आरोपी थांबले नाहीत तर त्यांनी चाकूचा वार करून जखमी होऊन खाली पडलेल्या तृतीयपंथी व्यक्तीचा गळा आवळून ठार करण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिकार आणि आरडाओरडा सुरू झाल्याने आरोपी पळून गेले.

या घटनेत जबर जखमी झाला आहे. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयात तो बोलण्याच्या स्थितीत आल्यावर त्याचा जबाब घेत पोलिसांनी चार तारखेला गुन्हा नोंद केला. गुन्हा नोंद होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ यांनी तातडीने कारवाई करीत आरोपींना अटक केले आहे.

# फ्लेमिंगोंना आता ड्रोनचा धोका; 'नॅटकनेक्ट'ची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**नवी मुंबई : बातमीदार**

विमाने आणि दगडफेक करणाऱ्यांनंतर ड्रोनमुळे नवी मुंबईच्या पाणथळ भागात फ्लेमिंगोच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण होत असल्याची तक्रार नॅटकनेक्ट फाऊंडेशन यांनी मुख्यमंत्री आणि पोलिसांकडे केली आहे.

दहा दिवसांपूर्वी एमिरेट्सचे विमान मुंबई विमानतळावर उतरत असताना अपघात होऊन तब्बल ३९ फ्लेमिंगो ठार झाले होते. अलीकडे, फ्लेमिंगो शहरातील गुलाबी पक्ष्यांना जवळून पाहण्यासाठी पाणथळ प्रदेशात जाणारे पक्षीप्रेमी, पक्ष्यांवर काही वेळा ड्रोन उडवत आहेत. काही वेळा, ड्रोन पक्ष्यांपेक्षा फक्त एक किंवा दोन फूट वर उडवले जातात, असे नॅटकनेक्ट फाऊंडेशनने मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

नॅटकनेक्टचे संचालक बी एन कुमा यांनी वन्यजीव संरक्षण कायदा- १९७२ अंतर्गत येणाऱ्या नाजूक पक्ष्यांना धारदार, फिरवणारे प्रोपेलर ब्लेड खूप दुखापत करू शकते. पक्ष्यांसाठी सर्वांत वाईट आणि त्याहूनही धोकादायक गोष्ट म्हणजे ड्रोन, तफ्लेमिंगोच्या उड्डाणांच्या वेळीही त्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करतात, कुमार म्हणाले आणि ड्रोनला फ्लेमिंगो झोनपासून दूर ठेवण्यासाठी अधिकृत हस्तक्षेपाची मागणी केली.

ड्रोन चालवणाऱ्या तरुण उत्साही लोकांना हे माहित नसेल की त्यांचे ड्रोन या लोकांना आवडत असलेल्या पक्ष्यांना धोक्यात आणतात, असे सेव्ह फ्लेमिंगोज अँड मँग्रोव्हज फोरमच्या रेखा सांखला म्हणाल्या आणि त्यांना शिक्षित करण्याचे आवाहन केले. माझ्यासारख्या सामान्य माणसाने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केल्यास लोक विद्रोह करून हिंसक होण्याचा धोका आहे, ती म्हणाली आणि संरक्षित प्रजातींसाठी कायदा लागू करण्यासाठी गणवेशातील एका पोलिसाला सुचवले.

ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यात भरतीच्या पाण्याची पातळी वाढल्यावर टीएस चाणक्य, एनआरआय आणि डीपीएस फ्लेमिंगो झोनमध्ये उतरणाऱ्या पक्ष्यांना ड्रोन त्रास देतात. मोठ्या नवी मुंबईतील जलकुंभांना TCFS च्या सॅटेलाईट वेटलँड मानले जाते.

बर्डर ज्योती नाडकर्णी म्हणाले की, असुरक्षित ड्रोन संस्कृती विषाणूप्रमाणे पसरत आहे, बहुतेकदा प्रमुख फ्लेमिंगो झोनमध्ये दिसून येते आणि ते आत्ताच तपासले पाहिजे.

बऱ्याचदा निहित स्वार्थाच्या इशाऱ्यावर काम करणारे काही बदमाश पक्ष्यांना पळवून लावण्यासाठी त्यांच्यावर दगडफेक करतात, असे पर्यावरणवाद्यांनी सांगितले. एकदा पक्षी येथे उतरणे बंद केले की निहित स्वार्थी लोक असा दावा करू शकतात की जलकुंभ आता फ्लेमिंगोचे निवासस्थान नाहीत आणि म्हणून ही क्षेत्रे विकासासाठी खुली करा, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.



## बेलापूर मतदारसंघात केलेली मेहनत कामी आली -आमदार म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

नरेश म्हस्के यांचा विजय हा नरेंद्र मोदींचे हात बळकट करणारा ठरला आहे. त्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर विधानसभा मतदार संघातील कार्यकर्त्यांचे, मतदारांचे आभार मानले आहेत.



त्या म्हणाल्या की, मोदींना मतदान करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने बाहेर पडले होते. आमच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांना मतदान करण्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही बेलापुर विधानसभा क्षेत्रात तयारी केली होती. पक्ष नेतृत्वाने दिलेल्या कार्यक्रमानुसार आम्ही कत्य केले. उमेदवार कोणीही असो, उमेदवार जाहीर होण्याआधीपासून चौक सभा घेण्यास सुरुवात केली होती. त्याचा फायदा नरेश म्हस्के यांचा चेहरा घराघरांत पोहचवण्यासाठी आम्ही यशस्वी ठरल्याचे दिसून आले.

आम्ही केलेल्या मेहनतीचा फायदा मतदानाची टक्केवारी वाढवण्यात झाला होता. तसाच तो आम्हाला लीड मिळवून देण्यासाठी देखील झाला आहे. यापुढे आम्ही मिळून नवी मुंबईच्या विकासात हातभार लावू.

## जमीन वाचवण्यासाठी पाणी साठवा; पर्यावरणप्रेमींची साद

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाच्या अगोदर, पर्यावरण प्रेमींनी सर्व राजकीय पक्षांना त्यांच्यातील मतभेद विसरून पाणी संरक्षण, संवर्धन आणि संरक्षित करण्यासाठी हरित कव्हर वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले होते.

जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळाची लवचिकता ही पर्यावरण दिनाच्यची थीम आहे, नॅटकनेक्ट फाउंडेशनने सर्व राजकारण्यांना एका खुल्या पत्रात निदर्शनास आणले आणि जलसंवर्धन हे त्या दिशेने पहिले पाऊल असल्याचे सांगितले. कृतीची सुरुवात वरून झाली पाहिजे आणि 'जल नाही कल नाही 'चा संदेश संसदेपासून पंचायतीपर्यंत पोहचला पाहिजे, असे नॅटकनेक्टचे संचालक बी.एन. कुमार म्हणाले.

### समस्येच्या दिशेने पहिले पाऊल उचला

**मुंबई दररोज १७०० दशलक्ष लिटर (एमएलडी) आणि नवी मुंबई सुमारे ४५० एमएलडी आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका सुमारे २१० एमएलडी संकलन करते. बहुतेक प्रक्रिया केलेले पाणी समुद्रात वाहून जाते जे निव्वळ कचरा आहे, नेटकनेक्टने सांगितले आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाच्या प्रभावी समस्येच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्याची सूचना महाराष्ट्र सरकारला केली. मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) मध्ये नऊ महानगरपालिकांसह १८ शहरी क्षेत्रे आहेत आणि शहरी विकासाने पुनर्वापर केलेल्या पाण्याच्या प्रभावी वापरावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.**

एएफआरचे सह-संस्थापक, इंदूरस्थित संजय गुप्ता म्हणाले, आम्हाला चांगले अधिकारी आणि खंबीर निर्णय घेणाऱ्यांची गरज आहे. वॉचडॉग फाऊंडेशनच्या गॉडफ्रे पिमेंटा यांनी सांगितले की, पाण्याच्या टंचाईचा सामना करण्यासाठी पावसाचे पाणी साठवणे हा एक महत्त्वाचा उपाय आहे आणि पावसाचे पाणी साठवून आणि साठवून आपण भूजलाच्या कमी होत असलेल्या स्त्रोतांवरचे अवलंबित्व कमी करू शकतो.

## जुन्नर हापूस आंब्याच्या हंगामाला सुरुवात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारात मेअखेर कोकणातील हापूसचा हंगाम संपताच जुन्नर आंबा हंगामाला सुरुवात होते. बाजारात सध्या ३ ते ४ गाड्या दाखल होत आहेत. प्रतिडझन जुन्नर आंब्याला ५०० ते ९०० रुपये दर आहे, मात्र यंदा हंगामाला उशिराने सुरुवात होत आहे.

पावसाळी फळांच्या हंगामाला सुरुवात झाली असून बाजारात आता केशर, नीलम, तोतापुरी, राजापुरी, बलसाड या जातीचे आंबे दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. मेअखेरीस बाजारात जुन्नर हापूस दाखल होण्यास सुरुवात होते. मात्र सध्या बाजारात कमी प्रमाणात जुन्नर हापूस दाखल होत असून जूनमध्ये आवक वाढेल, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.



अवकाळी पावसामुळे यंदा छाटणी उशिराने झाली. त्यामुळे बाजारात जुन्नर आंबे दाखल होण्यास विलंब होत आहे, अशी माहिती व्यापारी संजय पिंपळे यांनी दिली आहे. जून १० नंतर बाजारात जुन्नर हापूस वाढणार आहे. सध्या बाजारात जुन्नर हापूसच्या ३ ते ४ गाड्या दाखल होत आहेत. जुन्नर हापूस प्रतिडझन ५००-९०० रुपयांनी विक्री होत आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात कंपोस्ट खतनिर्मिती कार्यशाळा उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात खास शिक्षकांसाठी कंपोस्ट खतनिर्मितीच्या कार्यशाळेचे आयोजन बुधवारी (दि. ५) जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करण्यात आले होते. ही कार्यशाळा अंकुर सामाजिक संस्था नवी मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. पर्यावरणपूरक अनेक उपक्रम या संस्थेतर्फे घेतले जातात.



या कार्यशाळेत घन आणि ओल्या कचऱ्याचे विलानीकरण करून त्यापासून कंपोस्ट खत कसे बनवावे, फळांच्या सालीचा वापर करून त्यापासून सुगंधी द्रव्य घरगुती वापरासाठी बनविण हे शिकवण्यात आले. 'माझा कचरा, माझी जबाबदारी' या उपक्रमांतर्गत अंकुर संस्थेतर्फे शून्य कचरा याबाबत मार्गदर्शन केले गेले. या कार्यशाळेचा फायदा सर्व शिक्षक नक्कीच भविष्यात करून घेतील. कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल सर्व शिक्षकांनी प्राचार्या निशा नायर यांचे आभार मानले.

या उपक्रमांबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## 'कविता डॉट कॉम'ची वाशीत काव्य मैफिल

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ, मुंबई विभागातील, छाया मेढेकर या एकूण ३८ वर्षे अखंड सेवा करून सेवानिवृत झाल्या. त्यांच्या निवृत्ती समारंभानिमित्त वाशी येथे कविता डॉट कॉम हा विशेष कार्यक्रम ठेवण्यात आला होता.



शिव तुतारी प्रतिष्ठान संचलित, कविता डॉट कॉम हा परिवार, संवाद नात्यांचा जोडत, सांधत नेहमी फिरत असतो. या कार्यक्रमांत लोककवी जितेंद्र लाड, स्वाती शिवशरण, रूद्राक्ष पातारे, अंकिता गोळे आणि सूत्र संचालक म्हणून शंकर गोपाळे यांनी कार्यक्रमात सर्वांची मने जिंकली. आई, बाई, माय, आजी, बाप, ते नातू पणतूपर्यंत कविता सादर झाल्यात,कधी गावाच्या तर कधी आई आणि बाप यांच्या आठवणीने रसिक मंत्रमुग्ध झालेत. निर्मिती सूत्रधार रवींद्र पाटील यांनी छाया मेढेकर यांनी गेल्या अडतीस वर्षात उत्कृष्ट सेवा केल्याचा उल्लेख करून, मराठी भाषा, संस्कृती साठी मेढेकर कुटूंब कविता कार्यक्रम आयोजित करून आपला नेहमीच एक वेगळा पायंडा पाडत समाज आणि राष्ट्र सेवा करण्यात अग्रेसर असल्याचे नमूद केले.

वाडा, वस्ती, शिवार,शाळा, वृध्दाश्रम,यात्रा,जत्रा,कीर्तन, मंदिर, लग्न समारंभ,ते सर्वात संपन्न, सुंदर अशा बँक्वेट हॉलमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. वास्तविक खूप वेगळी संकल्पना, आयोजन, नियोजन आणि विशेष म्हणजे सेवा निवृत्ती समारंभास काहीही भेट न घेता,एक सुंदर झाडाचे रोप स्विकारून अतिशय शिस्तबध्द रित्या हा कार्यक्रम झाला. दिनेश मेढेकर, कस्तुरी मेढेकर, मनीषा पाटील, दादा पडळकर आणि इतर मान्यवर यांनी देखील आपल्या भावना सौ. छाया मेढेकर यांच्या बाबत व्यक्त करून शुभेच्छा दिल्यात.सर्वच पाहुणे मंडळी यांनी कविता डॉट कॉम कार्यक्रम बद्दल खूप चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त करून समाधान व्यक्त केले.

# खासदार सुनील तटकरेंना पेण मतदारसंघात सर्वाधिक मताधिक्य

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघात सध्या चर्चेचा विषय ठरलाय तो पेण विधानसभा मतदारसंघ. याच मतदारसंघाने महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना संपूर्ण लोकसभा मतदारसंघात सर्वांत मोठे मताधिक्य मिळवून दिले आहे. या एकाच मतदारसंघात तटकरेंना ४६ हजार ९३६ एवढे मताधिक्य मिळाल्याने त्यांचा विजय सुकर झाला.

रायगड लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. या सर्व मतदारसंघांमध्ये पेण मतदारसंघाने तटकरे यांना मोठा लीड दिला आहे. त्या खालोखाल शेकापची ताकद असलेल्या अलिबाग विधानसभा मतदारसंघात ३८ हजार ९९६, श्रीवर्धन मतदारसंघात २९ हजार ८७२ आणि महाड मतदारसंघात तीन हजार ६१६ मते अनंत गीतेंपेक्षा अधिक मिळाली.

पेण मतदारसंघाची धुरा आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशिल पाटील यांनी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष प्रीतम पाटील, जि.प.चे माजी उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम केल्याने तटकरेंना पेणमधून मोठे मताधिक्य मिळाले.

याबाबत अधिक माहिती देताना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, पेण विधानसभा क्षेत्रात भाजप आणि मित्रपक्षांनी एकजुटीने व प्रामाणिकपणे काम केल्यामुळेच आमचे उमेदवार सुनील तटकरे यांना मोठा लीड मिळाला आणि ते ८२ हजारपेक्षा जास्त मतांनी निवडून आले आहेत.

भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत निश्चित कामी आली असून हे परिश्रमाचे फळ प्राप्त झाले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतसुद्धा पेण मतदारसंघ आपले मताधिक्य कायम राखून विजय प्राप्त करेल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी या वेळी व्यक्त केला.



**रोहा : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत रायगड मतदारसंघातून भरघोस मताधिक्याने विजयी झालेले महायुतीचे उमेदवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे अष्टमी नाक्यावर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरेंद्र जैन, दिलीप टके, डॉ. राजेंद्र धात्रक, हरीश काळे, प्रकाश जैन, बाळासाहेब टके, बिपीन सोष्टे, मंगेश तेरडे, प्रथमेश काळे, मनोज टके, चेतन टके, सिद्धार्थ काळे, निलेश म्हात्रे, उमेर सांगडे आदी उपस्थित होते.**

## पोलादपूर शहरात महायुतीकडून खासदार तटकरेंच्या विजयाचा जल्लोष

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांच्या विजयाचा जल्लोष शहरामध्ये करण्यात आला. यामध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.



रायगड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांचा ८० हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव करून विजय संपादन केला. याबद्दल महायुतीच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून फटाक्यांची आतषबाजी करीत आणि खालू ताशाच्या निनादात जल्लोष साजरा केला. या वेळी पोलादपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ महायुतीकडून घोषणाबाजी करून विजयोत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर महामार्गापासून बाजारपेठमार्गे मिरवणूक काढण्यात आली.

या विजय मिरवणुकीत शिवसेनेचे उपनगराध्यक्ष नागेश पवार, नगरसेवक विनायक दिक्षित, प्रसाद इंगवले, सनी विचारे, प्रसाद मोरे, नारायण साने, अनिल दळवी, सिद्धेश कळंबे, भाजपचे प्रसन्ना पालांडे, महेश निकम, भाऊ सुर्वे, समाधान शेठ, मनसेचे दर्पण दरेकर, ओंकार मोहिरे, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मुश्ताक मुजावर यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते सहभागी झाले.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून रोह्यात आनंदोत्सव

### खासदार तटकरेंनी घेतले धावीर महाराजांचे दर्शन

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा निवडणुकीत विद्यमान खासदार सुनील तटकरे यांनी पुन्हा एकदा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्यावर मात करीत विजय संपादन केला. यानंतर रोहा शहरात एकच जल्लोष करण्यात आला. खासदार तटकरेंचे शहरात आगमन झाल्यानंतर ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतले.



या वेळी खासदार सुनील तटकरे यांच्या पत्नी वरदा तटकरे, मुलगी महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, पुत्र आमदार अनिकेत तटकरे, आमदार तटकरे यांची पत्नी वेदांती तटकरेही दर्शनासाठी आले होते. त्याचप्रमाणे आनंद परांजपे, रत्नप्रभा कापरे, सुभाष राजे, मकरंद बारटक्के, प्रशांत देशमुख, आनंद कुलकर्णी, अहमद दर्जी, महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, समीर सकपाळ, राजेंद्र जैन, राकेश जैन, प्राजक्ता चव्हाण, श्रद्धा पाटणकर, स्नेहा आंब्रे, मयूर दिवेकर, अजित मोरे, मोतीशेठ जैन, रूपेश पाटील, मयूर पायगुडे, चंद्रकांत पार्टे, जितेंद्र गायकवाड, जालिंदर शेवाळे, विनीत वाकडे आदी उपस्थित होते.

### कोकणाच्या विकासाला चालना देणार!

या वेळी खासदार तटकरे म्हणाले की, मला मिळालेला विजय धावीर महाराजांच्या चरणी समर्पित करतो. चुरशीच्या झालेल्या लढतींमध्ये महाराष्ट्रातील वातावरण आपण सर्वांनी पाहिले. निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यापासून वेगवेगळे तर्कवितर्क करण्यात आले, परंतु मला देदीप्यमान यश मिळाले. ८० हजारपेक्षा जास्त मतांचा फरक रायगड-रत्नागिरीतील जनतेने ठेवत विक्रमी पद्धतीने मतदान दिले. त्यामुळे या जनतेचा मी कायमच ऋणी राहिन. देशामध्ये पुन्हा एकदा एनडीएचे सरकार स्थापन होणार आहे. कोकणाच्या विकासाला चालना देण्याचे काम १८व्या लोकसभेच्या माध्यमातून निश्चित प्रमाणे करेल.

## श्रीवर्धनकर सुनील तटकरेंच्या पाठिशी कायम; मतांची दिली आघाडी

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या मतमोजणीमध्ये राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात पहिल्या फेरीपासून ते शेवटच्या फेरीपर्यंत तीन फेऱ्या वगळता महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनी उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार अनंत गीते यांच्यावर आघाडी घेतली. श्रीवर्धन मतदारसंघाने खासदार तटकरे यांना या लोकसभा निवडणुकीत २९ हजार ८७२ इतके मताधिक्य दिल्याचे समोर आले आहे.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी पक्षाचा बालेकिल्ला आहे. या मतदारसंघातून सध्या राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री व खासदार सुनील तटकरे यांची कन्या आदिती तटकरे प्रतिनिधीत्व करीत आहेत. या मतदारसंघात खासदार सुनील तटकरे यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. त्यांचा दांडगा संपर्क तसेच मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून झालेल्या विकासामुळेच या मतदारसंघात खासदार तटकरे यांना चांगले मताधिक्य मिळाले आहे.

सत्ताधारी संविधान बदलणार या मुद्द्यावर विरोधकांनी निवडणूक प्रचारात भर दिला. त्याचप्रमाणे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात मुस्लिम, दलित व कुणबी समाज कोणाच्या पाठीशी उभी राहणार याचीही चर्चा जोरदार सुरू होती, परंतु सुनील तटकरे यांनी केलेल्या कामाची पोचपावती मतदारांनी त्यांना दिल्याचे लोकसभा निवडणुकीत निकालातून दिसून येते.



**पुणे : मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी दणदणीत विजय मिळवला. याबद्दल भाजपचे खोपोली शहराध्यक्ष रमेश रेटेकर व विधानसभा समन्वयक हेमंत नांदे यांनी मतमोजणी केंद्राबाहेर त्यांचे अभिनंदन केले.**

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुस्तकाचे प्रकाशन

**मुरूड : वृत्तसंस्था**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मानवाकडून कोणकोणत्या बाबींची दक्षता घेतली पाहिजे. कांदळवन तोडीचे प्रमाण घटले पाहिजे. त्याचप्रमाणे पावसाचे प्रमाण कायम म्हणजेच सर्वत्र पाऊस हा किमान २२०० मिलीमीटर एवढा पडणे खूप गरजेचे आहे यासाठी जनजागृती करण्यासाठी परिमंडळ वनाधिकारी डॉ. निलेश चांदोरकर यांनी एक पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन झाले.



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून परिमंडळ वनअधिकारी डॉ. निलेश चांदोरकर यांनी कांदळवनांच्या तोडीचा किनारपट्टीवरील लोकांच्या जीवनावर झालेला परिणाम तसेच वनहक्क कायदा २००६च्या अंमलबजावणीचा पश्चिम घाटातील सरकारी वनक्षेत्रावर झालेला परिणाम या दोन विषयांवरील लिहिलेल्या पुस्तकांच्या इंग्रजी आवृत्तीचा प्रकाशन सोहळा नुकताच नवी मुंबईच्या अतिरिक्त पोलीस आयुक्त मीरा बनसोडे यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पर्यावरण व राजकीय समन्वयक जयशिल पालकर यांनी भूषविले, तर मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, उपाध्यक्ष शैलेश खोत, वास्तूविशारद व पर्यावरण कार्यकर्ती गायत्री पारकर, सुजित विचारे, सोनाली विचारे आदी उपस्थित होते.

या वेळी वक्त्यांनी आपले विचार व्यक्त करून ऱ्हास होत चाललेल्या पर्यावरणाविषयी चिंता व्यक्त केली तसेच ते रोखण्यासाठी शासन स्तरावर पर्यावरणाचे जतन होणे आवश्यक असून कडक कायदे अमलात आणले जावे, असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास विविध शासकीय अधिकारी व पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. सर्वांनी पर्यावरणरक्षण, जतन, संवर्धनाची शपथ घेतली. त्याचप्रमाणे याबाबत इतरांनामध्येही आवाहन करून जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## शेतीसाठी आधुनिक यंत्राचा वापर

**खोपोली : प्रतिनिधी**

आज यांत्रिकीकरणाच्या युगामध्ये शेतीमधील कामेही आधुनिक पद्धतीच्या यंत्राद्वारे केली जातात. त्यामुळे ग्रामीण भागात पूर्वी गावोगावी बैलाद्वारे करण्यात येणारी शेतीची मशागत इतिहासजमा होत आहे. त्याची जागा ट्रॅक्टरसारख्या अत्याधुनिक यंत्रणेने घेतली आहे.

ग्रामीण भागात पूर्वी गावोगावी आढळणारे जनावरांचे कळप आता कमी होत असल्याने पाळीव जनावरांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. त्यातच सतत जनावरांचा चारा व पाण्याची समस्या गंभीर बनत असल्याने जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा सध्या संकटात सापडला आहे. पूर्वी शेती मशागतीसाठी बैलाचा वापर केला जात असे. आजही तो होत आहे, मात्र मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत नाही.

शेतकऱ्याचा मित्र म्हणून बैलाची ओळख ग्रामीण भागामध्ये होती. त्या बैलांना जन्म देणारी गोमाता म्हणून ओळखले जाते, मात्र विज्ञानाच्या प्रगतीमुळे शेतकरी आता यांत्रिकीकरणाकडे वळून अत्याधुनिक पद्धतीने शेती करीत आहे. त्यातच औताच्या सहाय्याने शेती करण्यासाठी व बैलाद्वारे शेतीची मशागत करण्यासाठी सालगडीही मिळणे कठीण झाले आहे. सालगड्याच्या वेतनाचे भाव हे गगनाला भिडले आहेत. त्यामुळे औताने शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नाही.

ज्याच्याकडे जितके औत तितका शेतीचा दर्जा मोठा असा फार पूर्वी शेतकऱ्यांचा समज होता, पण आता यांत्रिकीकरणाच्या युगात बैलाची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे व ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, उखळण, पेरणी इत्यादी कामे केली जातात. ही शेतीची मशागत करण्यासाठी लागणारा वेळही थोडा लागतो.

आज या यांत्रिकीकरणाच्या जमान्यामध्ये शेतकरी अत्याधुनिक यंत्राकडे वळाला असून नवनवीन तंत्रज्ञान वापरून शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करीत मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे बैलाद्वारे करण्यात येणारी मशागत इतिहासजमा होत आहे.



### मान्सूनची प्रतीक्षा

**पेण :** पूर्वमोसमी पावसाच्या सरी बरसल्यानंतर सर्वांना आता मान्सूनची प्रतीक्षा आहे. मान्सूनचे केरळमध्ये आगमन झाल्यानंतर तो कर्नाटक, गोव्यात धडकला. महाराष्ट्राच्या वेशीवर आलेला मान्सून कधी बरसणार याचे वेध लागले आहेत.

## नागोठण्यात आज शनि जयंती उत्सव



**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्याचे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात गुरुवारी (दि. ६) शनिजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनि जयंतीनिमित्त रात्री ७ वाजता स्थापना कार्यक्रम, ७.३० वाजल्यापासून दर्शन सोहळा व महाप्रसाद, तद्नंतर ९.३० वाजता महाआरती होणार असल्याची माहिती आयोजक श्री शनि सेवा समितीने दिली.

## पेणमध्ये सायकल रॅली | निसर्गमित्रांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश







**पेण : प्रतिनिधी**

३ जून हा जागतिक सायकल दिन म्हणून ओळखला जातो. या सायकल दिनाचे औचित्य साधून पेणमधील निसर्गप्रेमी, लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिक तसेच डॉक्टर, पत्रकार यांनी सहभाग घेऊन बुधवारी (दि. ५) पेण शहरात सायकल रॅली काढली आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे आवाहन केले.

वाढती उष्णता, झालेली वृक्षतोड तसेच नष्ट केलेले डोंगर या सर्व गोष्टी लक्षात घेता पर्यावरणाची हानी रोखणे ही काळाची गरज बनली आसल्याने पेणमधील निसर्गप्रेमींनी सायकल रॅली काढून पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी जास्तीत जास्त सायकलचा वापर करण्याचा संदेश दिला. सायकल चालवा प्रदूषण रोखा, सायकल चालवा इंधन वाचवा, सायकल चालवा ध्वनी-वायू प्रदूषण रोखा, सायकल चालवा शरीर तंदुरुस्त ठेवा अशा प्रकारच्या घोषणा देत या निसर्गप्रेमींनी पेण शहरातून सायकल रॅली काढली.

'आम्ही काढलेली रॅली ही पर्यावरणपूरक असून लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांनीही या रॅलीमधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. सायकल चालविण्याने शरीरही तंदुरुस्त राहते, प्रदूषण होत नाही तसेच इंधन बचत होऊन पैसेदेखील वाचतात. म्हणूनच पर्यावरणाचे संतुलन राखण्याचा संदेश देण्यासाठी आम्ही सायकल रॅली काढली असल्याचे पर्यावरणप्रेमी साहेबराव मोहिते यांनी सांगितले.

# इंग्लंड-स्कॉटलंड सामन्यात पावसाची खेळी



**ब्रिजटाउनः वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि स्कॉटलंड यांच्यातील सामना पावसाच्या व्यत्ययामुळे धुवून निघाला. सामना रद्द झाला, पण यामुळे इंग्लिश चाहत्यांना सुखद धक्का बसला. दोन्हीही संघाना १-१ गुण देण्यात आले. खरेतर सामन्याच्या पूर्वसंध्येलादेखील पाऊस झाला. मग कशीबशी नाणेफेक झाली. जोस बटलरने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने इंग्लिश गोलंदाजांना घाम फोडला. सलामीवीर जॉर्ज मुशी आणि मायकल जोन्स यांनी स्फोटक खेळी केली.

पावसाची ये-जा सुरूच राहिल्याने सामना १०-१० षटकांचा खेळवला गेला. स्कॉटलंडने निर्धारित १० षटकांत ९० धावा केल्या, पण इंग्लंडच्या संघाला धावांचा पाठलाग करण्याची संधी मिळाली नाही. स्कॉटलंडकडून जोन्स व मुन्से या दोघांनी १० षटकांत संघाला बिनबाद ९० धावांपर्यंत पोहोचवले. मुन्से ३१ चेंडूंत चार चौकार व दोन षटकारांसह ४१, तर जोन्स ३० चेंडूंत चार चौकार व दोन षटकारांसह ४५ धावांवर नाबाद राहिला. डर्कवर्थ लुईस नियमानुसार गतविजेत्या इंग्लंडसमोर विजयासाठी ६० चेंडूंत १०९ धावांचे सुधारित लक्ष्य ठेवले गेले. पावसाच्या आगमनाने इंग्लंडची धाकधुक पुन्हा वाढवली होती. अखेरीस हा सामना रद्द करावा लागला आणि दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुणावर समाधान मानावे लागले.

दरम्यान, हा सामना रद्द झाल्यानंतर नामिबिया दोन गुणांसह ब गटात अव्वल स्थानावर आहे, तर इंग्लंड आणि स्कॉटलंड हे संघ प्रत्येकी एक गुणांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर गेले आहेत. या गटात ऑस्ट्रेलिया चौथ्या आणि ओमान पाचव्या स्थानावर आहे. स्कॉटलंड आणि इंग्लंड हा सामना रद्द झाल्याने इंग्लिश संघाला फायदा झाल्याचे बोलले जात आहे, कारण त्यांना १० षटकांत विजयासाठी ११० धावांची आवश्यकता होती. सामन्यात पावसाचा व्यत्यय सुरू होता. त्यामुळे सामना पार पडला असताच तर स्कॉटलंडच्या गोलंदाजांना मदत झाली असती.

## पाकिस्तानचा स्टार खेळाडू सलामीच्या सामन्यातून बाहेर

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट संघ ६ जून रोजी विश्वचषकातील आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. पाकिस्तानचा पहिला सामना यजमान अमेरिकेशी होणार आहे. सलामीच्या सामन्यापूर्वी पाकिस्तान संघाला मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे. संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू इमाद वसीम दुखापतीमुळे पहिल्या सामन्यातून बाहेर पडला आहे.

इमाद वसीम साइड स्ट्रेनच्या दुखापतीमुळे पहिल्या सामन्यात खेळू शकणार नाही. पाकिस्तान संघाचा कर्णधार बाबर आझमने इमादच्या अनुपस्थितीची पुष्टी केली आहे. संघाला या अष्टपैलू खेळाडूची उणीव भासू शकते. यानंतर तो पुढच्या सामन्यात खेळताना दिसेल अशी आशा संघाला आहे.

## पाकिस्तानी खेळाडूला सेलिब्रेशन पडले महागात

**एजबॅस्टन : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट संघाचे खेळाडू सतत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतात. त्यापैकी एक खेळाडू म्हणजे वेगवान गोलंदाज हसन अली, जो त्याच्या गोलंदाजीसह विचित्र कृत्यांसाठीदेखील ओळखला जातो. २०१८मध्येही झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात हसन अलीने विकेट घेतल्यानंतर सेलिब्रेशन करताना जखमी झाला होता. सेलिब्रेशनमुळे त्याच्या खांद्याला त्रास झाला होता. आता पुन्हा एकदा हसन अलीसोबत असे घडले आहे. या वेळी त्याच्या बरगड्यांना दुखापत झाली आहे, ज्याचा व्हिडीओ वेगाने व्हायरल होत आहे.




आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला २ जूनपासून सुरुवात झाली आहे, मात्र या स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या संघात हसन अलीला स्थान मिळालेले नाही. त्यामुळे तो सध्या खेळल्या जात असलेल्या टी-२० ब्लास्टमध्ये वॉर्विकशायरकडून खेळत आहे. या स्पर्धेत नॉटिंगहॅमशायरविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात हसन अलीने विकेट घेतल्यानंतर आपले प्रसिद्ध 'जनरेटर' सेलिब्रेशन केले, जे त्याला चांगलेच महागात पडले. या सेलिब्रेशनमुळे हसन अलीच्या बरगड्यांना वेदना झाल्या.

व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे की पाकिस्तानी वेगवान गोलंदाज प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजाला यॉर्कर चेंडू टाकून क्लीन बोल्ड करतो. यानंतर तो नेहमीप्रमाणे आपले जनरेटर सेलिब्रेशन करायला सुरुवात करताच त्याच्या बरगड्यांना त्रास होताना दिसत आहे, ज्यामुळे हसन अली अस्वस्थ दिसत आहे. २०१८मध्येही त्याच्यासोबत असेच घडले होते, तेव्हा त्याच्या खांद्याला त्रास झाला होता. या सामन्यात हसन अलीने नॉटिंगहॅमशायरच्या ऑली स्टोनला बोल्ड केले, जो केवळ तीन धावा करून बाद झाला.

वॉर्विकशायर आणि नॉटिंगहॅमशायर यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात हसन अलीच्या संघाने म्हणजेच वॉर्विकशायरने २२ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना वॉर्विकशायर संघ २० षटकांत १९.३ षटकांत सर्वबाद १४९ धावांत आटोपला. त्यानंतर नॉटिंगहॅमशायरचा संघ १९.२ षटकांत १२७ धावांत सर्वबाद झाला.

### अमृत महोत्सवी गोविंदराव मोहिते कॅरम स्पर्धा

## राज्यातील ४८ खेळाडूंमध्ये चुरस



**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुप व राष्ट्रीय मिल मजदूर संघ आयोजित अमृत महोत्सवी गोविंदराव माहिते चषक १९ वर्षाखालील मुलामुलींच्या कॅरम स्पर्धेत मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, रत्नागिरी, सिंधूदुर्ग आदी जिल्ह्यातील ४८ खेळाडूंमध्ये विजेतेपदासाठी चुरस होईल. ही स्पर्धा ६ जूनपासून परेल येथील आरएमएमएस सभागृहात रंगणार आहे.

राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी शुभेच्छा दिलेल्या कुर्ला येथील शालेय-कॉलेज सूर्यनमस्कार स्पर्धेत प्रणय मर्ढेकरने प्रथम, प्रतिक डावरेने द्वितीय, श्रेया जगतापने तृतीय आणि बैठका स्पर्धेत पियुष बावदाणेने प्रथम, ऋषभ थोरातने द्वितीय, वेदांत महाडिकने तृतीय क्रमांक पटकाविला.

गुरुवारपासून सुरू होणाऱ्या शालेय, कॉलेज मुला-मुलींच्या कॅरम स्पर्धेत राष्ट्रीय दर्जाचे ज्युनियर कॅरमपटू पोद्दार कॉलेजची रुची माचीवले, मराठा हायस्कूलची सिमरन शिंदे, डीपीवायए हायस्कूलचा कौस्तुभ जागुष्टे, एल.एन कॉलेजचा मिहीर शेख तसेच डॉ. आंबेडकर स्कूलचा समीर खान, पार्ले टिळक विद्यालयाचा सार्थक केरकर, सिध्दार्थ कॉलेजचा पृथ्वी बडेकर, डॉ. दासिल्व्हा हायस्कूलचा ध्रुव भालेराव आदी नामवंत खेळाडू पूर्ण तयारीनिशी खेळणार आहेत. त्यामुळे क्रीडापटू गोविंदराव मोहिते अमृत महोत्सवी चषक पटकाविण्यासाठी कॅरमच्या दर्जेदार लढती परेलकराना पाहण्यास मिळतील. विजेत्या-उपविजेत्यांना गौरविण्यात येणार आहे.

## नेदरलँड्सचा नेपाळवर विजय

**डल्लास : वृत्तसंस्था**

ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेत दहा वर्षांनंतर पुनरागमन करणाऱ्या नेपाळ संघाचा नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात पराभव झाला. मॅक्स ओ'डोडचा १८व्या षटकात नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलने सोडलेला झेल महागात पडला. मॅक्सने नाबाद ५४ धावा करून नेदरलँड्सला सहा विकेट्स राखून विजय मिळवून दिला.

नेपाळला २० षटकांत सर्वबाद १०६ धावा करता आल्या. नंतर नेपाळच्या गोलंदाजांनी सामना रंजक वळणावर आणला होता, पण जीवदाननंतर ओ'डोडने सलग दोन चेंडूंवर चौकार, षटकार ठोकत संघाचा विजय पक्का केला. नेदरलँड्सने १८.४ षटकांत चार बाद १०९ धावा केल्या.

## रविचंद्रन अश्विन 'सीएसके'मध्ये परतला; हाय-परफॉर्मन्स सेंटर सांभाळण्याची जबाबदारी

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटव्यतिरिक्त भारताचा अनुभवी फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनची अलीकडच्या काळात आयपीएलमध्येही उत्कृष्ट कामगिरी राहिली आहे. त्याने राजस्थान रॉयल्ससाठी जबरदस्त गोलंदाजी केली आणि संघाच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिले. अश्विन आतापर्यंत आयपीएलमध्ये पाच संघांसाठी खेळला आहे. त्याने २००८ ते २०१५पर्यंत चेन्नई सुपर किंग्जची जर्सी परिधान केली होती. त्यानंतर तो वेगवेगळ्या संघांकडून खेळत राहिला. आता हा स्टार ऑफ स्पिनर पुन्हा एकदा सीएसकेच्या ग्रुपमध्ये दाखल झाला आहे.

अश्विन सध्या राजस्थान रॉयल्सचा खेळाडू म्हणून सदस्य आहे, कारण संघाने त्याला अद्याप रिलीज केलेले नाही. दरम्यान, अश्विनला सीएसकेकडून एक मोठी ऑफर मिळाली आहे, जी तो नाकारू शकला नाही. तो पुन्हा एकदा त्याच्या जुन्या टीमशी जोडला गेला आहे, मात्र अश्विन अद्याप खेळाडूच्या भूमिकेत परतलेला नाही. संघाची मालकी असलेल्या इंडिया सिमेंट्स या कंपनीने त्याला नवी जबाबदारी दिली आहे.

अश्विनकडे सीएसकेचे हाय-परफॉर्मन्स सेंटर सांभाळण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. हे केंद्र आयपीएल २०२५च्या हंगामाच्या सुरुवातीपर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. अश्विन या सेंटरच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. तामिळनाडूमध्ये सीएसकेच्या अनेक अकादमी आहेत. मुख्य संघाव्यतिरिक्त हाय-परफॉर्मन्स सेंटर अकादमीच्या खेळाडूंवरही लक्ष ठेवेल.

इंडिया सिमेंट्समध्ये परतल्यावर अश्विन म्हणाला, खेळ पुढे नेणे आणि क्रिकेट जगतात योगदान देणे हे माझे प्राथमिक ध्येय आहे. ज्या ठिकाणी हे सर्व माझ्यासाठी सुरू झाले त्या ठिकाणी परत आल्याने मला खूप आनंद झाला आहे. सीएसकेचे सीईओ काशी विश्वनाथनदेखील अश्विन पुन्हा एकदा सीएसकेशी जोडला गेल्यामुळे खूप खूश आहेत. अश्विनच्या पुनरागमनामुळे तो पुढच्या मोसमातही संघासाठी खेळू शकतो, अशा अटकळांना उधाण आले आहे. चेन्नईचा संघही त्याच्यासाठी बोली लावू शकतो.

आयपीएल २०२५च्या हंगामापूर्वी मोठा लिलाव होणार आहे. रिटेनशन अद्याप निश्चित झालेले नाही, परंतु फ्रँचायझीला जास्तीत जास्त चार खेळाडूंनाच कायम ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकते, असे सांगण्यात आले आहे. असे झाल्यास राजस्थान रॉयल्सला अश्विनला कायम ठेवणे कठीण होईल.

## द्रविडबद्दल बोलताना रोहित झाला भावूक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेला टी-२० विश्वचषक भारताचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड याची कोचच्या भूमिकेतील अखेरची टूर्नामेंट असणार आहे. यानंतर भारतीय संघाला नवा प्रशिक्षक मिळणार आहे. द्रविडच्या प्रशिक्षक म्हणून अखेरच्या स्पर्धेबद्दल प्रश्न विचारल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा भावूक झाला.

द्रविडच्या प्रशिक्षणाखाली भारतीय संघाला आयसीसीचे जेतेपद मिळवता आले नसले तरी संघाची झालेली प्रगती ही तितकीच महत्त्वाची आहे. द्रविडने स्पष्ट केले की, टी-२० विश्वचषक ही त्याची प्रशिक्षक म्हणून भारतीय संघासोबतची शेवटची स्पर्धा असेल. यानंतर द्रविडच्या प्रशिक्षकपदाबद्दक विचारल्यानंतर रोहित शर्मा म्हणाला की, त्याने द्रविडला भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी कायम राहण्याची विनंती केली होती. मी त्याच्याच नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. तो आपल्या सर्वांसाठी एक मोठा आदर्श आहे.

## सचिनला २००७च्या वर्ल्डकपनंतर निवृत्तीपासून व्हिव रिचर्ड्स यांनी रोखले होते

**मुंबई : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला महान खेळाडू म्हटले जाते. त्याला त्याच्या यशस्वी कारकिर्दीच्या मध्यावर क्रिकेटमधून निवृत्ती घ्यायची होती. असे जर झाले असते, तर सचिन तेंडुलकर आपल्याला २०११च्या एकदिवसीय विश्वचषकात खेळताना दिसला नसता. त्याचबरोबर भारतीय संघाला विश्वचषक जिंकून देण्याचे सचिने स्वप्न पूर्ण झाले नसते, पण त्याला २००७च्या वर्ल्डकपनंतर एका व्यक्तीने निवृत्ती घेण्यापासून रोखले. मग वर्ल्डकप जिंकण्याचे सचिनचे स्वप्न पूर्ण झाले.



२००७च्या एकदिवसीय विश्वचषकात भारतीय क्रिकेट संघात सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग, महेंद्रसिंह धोनी, युवराज सिंग आणि राहुल द्रविड यांसारख्या महान फलंदाजांचा समावेश होता, परंतु भारतीय संघ बांगलादेश आणि श्रीलंकेकडून पराभूत झाल्याने पहिल्याच फेरीतूनच बाहेर पडला. यानंतर संघ जेव्हा भारतात परतला, तेव्हा चाहत्यांनी या खेळाडूंचे पुतळे जाळण्यास सुरुवात केली. त्यानंतर सचिन तेंडुलकर एक मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत होता.

२००७ च्या स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाच्या पराभवामुळे दु:खी झालेला सचिन तेंडुलकर क्रिकेटमधून निवृत्ती घेणार होता. खुद्द सचिनने त्याच्या 'प्लेइंग इट माय वे' या आत्मचरित्रात याचा खुलासा केला आहे. त्याने म्हटलेय की त्याचा मूड खूप खराब होता आणि क्रिकेटमधून निवृत्ती घेणार होता, पण एका व्यक्तीने त्याला असे करण्यापासून रोखले. त्या वेळी मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर ३४ वर्षांचा होता.

ज्या व्यक्तीने सचिन तेंडुलकरला लवकर निवृत्ती घेण्यापासून रोखले, ते दुसरे कोणीही नसून वेस्ट इंडिजचे माजी फलंदाज सर व्हिव रिचर्ड्स होते. सचिनने सांगितले की, व्हिव रिचर्ड्सने मला वेस्ट इंडिजमधून फोन केला आणि आम्ही सुमारे ४५ मिनिटे बोललो. तो म्हणाला की माझ्यात अजून खूप क्रिकेट शिल्लक आहे. त्यामुळे मी निवृत्ती घेण्याचा विचारही करू नये.

सचिन तेंडुलकरने आपल्या पुस्तकात म्हटले आहे की, मी मोठा होत असताना व्हिव माझा हिरो होता आणि कायम राहील. तो माझ्याशी लहान भावासारखा वागतो. त्यामुळे जेव्हा त्याने मला फोन करून खेळत राहण्यास सांगितले, त्याचे हे शब्द माझ्यासाठी खूप मोलाचे ठरले. यानंतर मी खेळत राहिलो आणि २००८मध्ये सिडनीमध्ये शतक झळकावून फॉर्ममध्ये परतलो.

सचिनने आपल्या कारकिर्दीत वनडेमध्ये १८ हजार ४२६ आणि कसोटीत १५ हजार ९२१ धावा केल्या आहेत. आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याने १०० शतके ठोकली आहेत, जो एक विक्रम आहे.

## प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर हनुमा विहारीला आंध्र प्रदेश संघाकडून एनओसी

**अमरावती : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटपटू हनुमा विहारी याचे आंध्र प्रदेश क्रिकेट संघ व्यवस्थापनाशी झालेले वाद सर्वश्रुत आहेत. या वादामुळे हनुमा विहारी गेल्या काही महिन्यांपासून देशांतर्गत क्रिकेटपासून दूर आहे. आंध्र प्रदेश क्रिकेट व्यवस्थापनाबरोबर झालेल्या वादामुळे त्याला आंध्रच्या संघातून खेळण्याची संधी मिळत नव्हती तसेच आंध्र क्रिकेट असोसिएशनने (एसीए) ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) न दिल्याने हनुमाला इतर कोणत्याही संघाकडून खेळता येत नव्हते, मात्र आता एसीएने हनुमाला हे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे तो इतर संघांकडून देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसू शकतो.

एसीएने हनुमाची कर्णधारपदावरून उचलबांगडी केल्यानंतर त्याने संघ व्यवस्थापन आणि एसीएवर गंभीर आरोप केले होते. त्यामुळे हा वाद वाढत गेला. परिणामी हनुमाने आंध्र प्रदेश संघाकडून खेळण्यास नकार दिला. त्यानंतर एसीएने त्याला कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या निकालासह आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीचा निकालही जाहीर झाला. आंध्र प्रदेशमध्ये सत्तांतर झाले आहे. राज्यात मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसची धुळधाण उडाली आहे. आता तेलुगू देशम पक्ष आणि जनसेना पक्ष मिळून राज्यात सरकार स्थापन करणार आहेत.



**मी दोन महिन्यांपासून एनओसी मागत होतो. त्यांना चार वेळा ई-मेल केला, पण त्यांनी मला एनओसी दिले नाही. आता राज्यातील चित्र बदलले असून मला लगेचच एनओसी मिळाले.**

**-हनुमा विहारी**

देशांतर्गत क्रिकेटमधून एका खेळाडूला दुसऱ्या राज्याच्या किंवा इतर संघाकडून क्रिकेट खेळायचे असेल, तर त्याला त्याच्या राज्याच्या संघ व्यवस्थापनाकडून एनओसी घ्यावे लागते. निवडणुकीच्या निकालानंतर हनुमा विहारीने एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, गेल्या दोन महिन्यांपासून मी एनओसीची मागणी करत होते. अखेर सोमवारी मला एनओसी मिळाले.

हनुमा विहारीने १६ कसोटीत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. या १६ कसोटीत हनुमाच्या नावावर ३३.५६च्या सरासरीने ८३९ धावा आहेत. यामध्ये एका शतकाचाही समावेश आहे. २०१९मध्ये हनुमाने वेस्ट इंडिजविरुद्ध १११ धावांची शानदार खेळी साकारली होती. २०२०-२१ भारतीय संघाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात सिडनी कसोटीतही त्याचे चिवट खेळी केली होती.

## प्रशिक्षकपदासाठी इच्छूक, पण गौतम गंभीर पद स्वीकारत असेल तर तो योग्य उमेदवार असेल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राहुल द्रविड याच्यानंतर भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक कोण होणार याबाबत बरीच चर्चा रंगली आहे. मागील काही दिवसांपासून क्रिकेटविश्वात एकच चर्चा रंगली आहे ती म्हणजे भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयने या पदासाठी अर्ज मागवले आहेत. या पदाच्या शर्यतीत माजी खेळाडू गौतम गंभीर आघाडीवर आहे. अलीकडेच खुद्द गंभीरने याबद्दल मौन सोडले असून आपली भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रीय संघाचा प्रशिक्षक होण्यापेक्षा कोणता मोठा सन्मान नाही, असे गंभीरने सांगितले.

दरम्यान, आता माजी खेळाडू आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली याने या पदासाठी इच्छुक असल्याचे सांगितले आहे. वृत्तसंस्था एएनआयशी बोलताना गांगुली म्हणाला की, मला टीम इंडियाचे प्रशिक्षकपद सांभाळायला आवडेल तसेच जर गौतम गंभीर हे पद स्वीकारत असेल तर तो या पदासाठी योग्य उमेदवार असेल.

### गांगुलीची भूमिका



गंभीर म्हणाला होता की, तुमच्या राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक होण्यापेक्षा मोठा सन्मान नाही. या पदावर असताना तुम्ही १४० कोटी भारतीयांचे आणि जगभरातील लोकांचेही प्रतिनिधित्व करत असता. जेव्हा तुम्ही भारताचे प्रतिनिधित्व करत असता... तेव्हा यापेक्षा मोठा सन्मान तो काय असू शकतो? पण मी भारताला विश्वचषक जिंकण्यासाठी कशी मदत करू शकतो? मला वाटते की भारताला विश्वचषक जिंकण्यास मदत करणारे १४० कोटी भारतीय आहेत. जर प्रत्येक भारतीय आमच्यासाठी प्रार्थना करू लागला आणि आम्ही त्यांचे प्रतिनिधित्व करू लागलो तर भारत विश्वचषक जिंकेल यात शंका नाही. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे निर्भय असणे गरजेचे आहे. जर तुम्ही मला विचाराल तर होय, मला भारतीय संघाचे प्रशिक्षक बनायला आवडेल.

वेस्ट इंडिज-अमेरिकेत आयोजित ट्वेन्टी-२० वर्ल्डकप प्रशिक्षक म्हणून माझी शेवटची स्पर्धा असेल असे राहुल द्रविडने स्पष्ट केले आहे. द्रविड भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदासाठी पुन्हा अर्ज करेल अशी अटकळ होती, पण त्याने स्वत:च शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. तो सध्या भारतीय संघासोबत शेवटच्या विश्वचषकात सहभागी झाला आहे.

जीवेत् शरदः शतम्!

रुपेश काटकर

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

विनोद सुतार

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com